cmyk

## संपादकीय

### तर सहकार पुन्हा ग्रामीण समृद्धीचा कणा बनावा

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली भारत सरकारने २५ जुलै रोजी राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ जाहीर केले. हे राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ हे २०४५ पर्यंत ग्रामीण रोजगार आणि सहकारी संस्थांच्या आर्थिक योगदानाला चालना देण्यासाठी तयार केले आहे. शहा यांनी सांगितले की, हे धोरण सर्वसामान्य व्यक्तीला केंद्रबिंदू मानते आणि २०३४ पर्यंत देशांतर्गत उत्पन्नात सहकार क्षेत्राचा वाटा तिप्पट होईल.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–९४ | मंगळवार, दि.२९ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### आ.रोहित पवार आज परळीत

परळी वै.: स्व.महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांची सांत्वनपर भेट घेण्यासाठी आज मंगळवार दि.२९ जुलै २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस तथा आ. रोहित पवार परळीत येत असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे परळी यांनी दिली आहे.आज दुपारी ४.०० वाजता महादेव मुंडे यांच्या निवासस्थानी ते भेट देणार आहेत.या सर्व प्रक्रियेमध्ये तपास व आरोपींना तात्काळ अटक व्हावी तसेच या प्रकरणा बद्दल माहिती जाणून घेण्यासाठी मयत महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांची भेट घेण्यासाठी आमदार रोहित पवार हे आज परळीत येत असल्याची माहिती यांनी दिली असून पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे पक्षाच्या वतीने यांनी केले आहे.

## थोडक्यात...

### बुद्धिबळ वर्ल्डकपमध्ये दिव्या देशमुख विजयी

मुंबई : बुद्धिबळ वर्ल्डकपमध्ये दिव्या देशमुख विजयी झाली आहे. दुसऱ्या ट्राई–ब्रेक राउंडमध्ये तिने विजय नोंदवला. ग्रँडमास्टर दिव्या देशमुख विश्वविजयी ठरली आहे.

### ठाकरे बंधू एकत्र आल्यास महायुतीचा प्लान बी तयार?

मुंबई : ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीविरोधात महायुतीचा प्लान बी समोर आला आहे. ठाकरेंच्या युतीविरोधात महायुतीचे नो रिस्क धोरण असल्याची माहिती समोर आली आहे. मतांची फाटाफूट टाळण्यासाठी महायुतीने प्लान तयार केला असून ज्या ठिकाणी वाद असतील ते वाद येत्या महिन्याभरात मिटवून निवडणुकीच्या तयारीला महायुती सुरुवात करणार असल्याचे बोलले जात आहे.

### एससीईआरटीच्या मसुद्यात तिसरी भाषा नाहीच

नवी दिल्ली : एससीईआरटीने इयत्ता तिसरी ते दहावी या इयत्तांसाठीचा शालेय शिक्षण अभ्यासक्रमाचा प्रस्तावित मसुदा जाहीर केला. यामध्ये शालेय शिक्षण विभागाने तिसरी भाषा हद्दपार केली आहे. या मसुद्यावर आता एससीईआरटीने शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, अभ्यासक, पालक, अधिकारी, संघटना आणि समाजातील इतर घटकांना आपले अभिप्राय देण्याचे आवाहन केले. एससीईआरटीने जाहीर केलेल्या २०२५च्या प्रस्तावित मसुद्यात मराठी, इंग्रजीसह २० विषयांचा समावेश आहे.

### शिवसेनेचे शिष्टमंडळ केंद्रीय निवडणूक अधिकाऱ्यांना भेटणार

मुंबई–केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निमंत्रणावरुन शिवसेनेचे एक शिष्टमंडळ मंगळवार, दि. २९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता केंद्रीय निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची भेट घेणार आहेत. निवडणूक आयोगाचे अधिकारी विविध पक्षांच्या प्रतिनिधींना भेटत असतात. त्यानुसार शिवसेनेच्या शिष्टमंडळाला निवडणूक आयोगाने निमंत्रण दिले आहे. या शिष्टमंडळात महाराष्ट्रातून मंत्री उदय सामंत आणि मंत्री शंभूराज देसाई आणि काही खासदार निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेणार आहेत.

# जीएम बियाणांवरून घमासान

## भारतीय किसान संघाचा विरोध; समर्थनार्थही अनेकजण उतरले



**मुंबई । प्रतिनिधी**

**भारत–अमेरिका व्यापारी कराराच्या पार्श्वभूमीवर जनुकीय सुधारित अर्थात जीएमच्या समर्थनात आणि विरोधात चर्चा सुरु झाली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संलग्न असलेला भारतीय किसान संघाने जीएमविरोधात केंद्र सरकारला साकडे घातले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा जीएम अन्नपदार्थ आयात चर्चेत आली आहे. येणाऱ्या काळात जीएम बियाणे आणि अन्नपदार्थावरुन घमासान झाले तर नवल वाटायला नको.**

नुकतीच नागपूर येथे भारतीय किसान संघाच्या कार्यकारी समितीची बैठक झाली. या बैठकीत भारतात जीएम बियाण्यांची आयात बंद आहे. त्यामुळे देशात येणारे अन्नपदार्थही जीएम मुक्त असावेत. सरकारने यासाठी कडक पावले उचलावीत, असा ठराव यावेळी पारित करण्यात आला आहे.

किसान संघाने अन्न सुरक्षा व मानक प्राधिकरण अर्थात एफएसएसएआयवर टीका केली आहे. एफएसएसएआयला जीएम अन्नावर पान २ वर

### गाईवर आधारित सेंद्रिय शेती

रसायनयुक्त शेतीमुळे अल्झायमर, कॅन्सर, त्वचा व श्वसनाचे आजार वाढले असून रसायनांमुळे अन्नधान्यांतील पोषणमूल्यंही गेल्या ५० वर्षांत ४५ टक्क्यांनी घटली असल्याचे संघाचा दावा आहे. त्यामुळे भारताने २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र होण्याच्या दृष्टिकोनातून गौ–कृषी वाणिज्य म्हणजेच गाईवर आधारित सेंद्रिय शेती स्वीकारली पाहिजे. अशा पद्धतीने अन्न उत्पादन केल्यास ते केवळ विषमुक्त आणि आरोग्यदायीच नाही, तर पोषकही ठरेल, असेही संघाने म्हटले आहे.



## पहिल्या श्रावणी सोमवारी जिल्ह्यातील शिवालय गजबजली

**बीड / परळी । प्रतिनिधी**

**श्रावणी सोमवार निमित्त जिल्यातील शिवालयात भाविकांनी मोठी गर्दी केली होती बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या परळीतील प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी देशभरातून भाविकांनी परळीत मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचे दिसून येते. कंकालेश्वर, कपीलधार, सौताडा, गोरक्षनाथ टेकडी यासह अन्य गडांवर आणि शिवालयांमध्ये हर हर महादेवचा गजर गाजर करत दर्शनासाठी गर्दी केली होती .**

श्रावण महिन्याचा पहिला सोमवार असल्याने शिवशंभेचे दर्शन घेण्यासाठी जिल्हाभरातल्या शिवालयांमध्ये भाविकांची मोठ्या प्रमाणावरगद पहावयास मिळत आहे. बाराज्योतिर्लिंगा पैकी एक पान २ वर

## गळकी शाळा:जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरावस्था कधी दूर होणार

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ३८१ शाळा इमारती पैकी ६०७ वर्गखोल्या नादुरुस्त आहेत अनेक ठिकाणी इमारतीच नाहीत विशेष म्हणजे पालकमंत्री यांनी नियोजनाच्या बैठकीत शाळा दुरुस्ती आणि इमारतीसाठी १४ कोटीचा प्रस्ताव ठेवला तो अद्याप पूर्ण झाला नसला तरी पावसाळ्यात अनेक शाळा पाणी गळतीमुळे विद्यार्थ्यांना डोक्यावर दप्तर घेऊन बसावे लागते तर शिक्षकांना शिकवण्या ऐवजी पाणी कसे थांबेल याचे धडे घ्यावे लागत आहेत.**



मागील आठवड्यामध्ये राजस्थान मधील झालवाड मध्ये शाळेचे छत कोसळून ३५ मुले जखमी झाले होते यातील नऊ जण गंभीर पान २ वर

# वसतिगृहातील मुलींसोबत अश्लील चाळे

## व्यवस्थापक प्रमोद खरातला अटक

**जालना । प्रतिनिधी**

**शहरातील रेल्वे स्थानक रस्त्यावर असलेल्या एका मुलींच्या वस्तीगृहात चक्क व्यवस्थापकानेच मुलींसोबत अश्लिल चाळे केल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून व्यवस्थापकास अटक करण्यात आली आहे.**

जालना येथील रेल्वे स्थानक रस्त्यावर जिल्हा परिषद प्रशालेच्या परिसरात निवासी क्रीडा प्रबोधिनी मुलींचे वस्तीगृह आहे. या वसतिगृहातील भौतिक सुविधांसह वसतिगृह व्यवस्थापकाच्या कारभाराबाबत गंभीर स्वरूपाच्या तक्रारी प्रशासनाकडे करण्यात आल्या होत्या. या तक्रारीच्या अनुषंगाने जालना पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी मनोज कोल्हे यांनी महिला केंद्रप्रमुख सुजाता भालेराव यांना सोबत घेत दोन दिवसांपूर्वी वसतिगृहाला भेट देऊन पाहणी केली होती. यावेळी अनेक मुलींनी व्यवस्थापक प्रमोद गुलाबराव खरात याच्याकडून होत असलेल्या गैरवर्तनाच्या गंभीर तक्रारींचा पाढाच वाचला. खरात हा मुलींना सीसीटीव्ही कॅमेरे नसलेल्या रूममध्ये नेऊन चुकीच्या ठिकाणी स्पर्श करीत असल्याचे सांगितले. वसतिगृहात महिला कोच उपलब्ध असतांना देखील खरात याने एका मुलीची छाती मोजली होती, सदर मुलगी याप्रकाराने प्रचंड घाबरली होती. त्यावेळी खरात याने कोणाला सांगू नको, म्हणून दमदाटी केली होती. मुलींसोबत वारंवार अश्लील वर्तन करणाऱ्या खरात याच्यासंदर्भातील तक्रारीची गंभीर दखल घेत रविवारी रात्री गटशिक्षण अधिकारी मनोज कोल्हे पान २ वर

## वडवणीत चोरट्याचा बिअर बारवर डल्ला

**वडवणी । प्रतिनिधी**

**चिंचवड वरील सोन्नाखोटा फाटा येथील मयूर बियर बार अँण्ड परमिट रूम या हॉटेलमध्ये मध्यरात्री धाडसी चोरी अज्ञात चोरट्यांनी केली आहे.यामध्ये हॉटेलमध्ये ठेवलेले विविध कंपन्यांच्या दारूचे बॉक्स सह सीसीटीव्ही कॅमेऱ्याची सीडीआर स्टोरेज व नगदी कॅश पळवल्याची घटना घडली आहे.**


सोन्नाखोटा फाटा येथे साधारण १० ते १५ वर्षापासून मयुर बियर बार अँण्ड परमिटरूम हे हॉटेल कार्यरत आहे. सदरील हॉटेलरात्री साडे दहा ते अकराच्या दरम्यान बंद करण्यात आले होते. यानंतर मध्यरात्री २ ते २.३० वा. अज्ञात चोरट्यांनी हॉटेलचे कुलूप तोडून आत मध्ये प्रवेश केला. हॉटेलमध्ये ठेवलेल्या विविध कंपन्यांच्या दारूचे बॉक्स याच्यासह सीसीटीव्ही पान २ वर

# एसटी देणार ओला, उबेरला टक्कर!

## परिवहन मंत्र्यांकडून सर्वात मोठ्या योजनेची घोषणा

**मुंबई । प्रतिनिधी**

**अॅप आधारित रिक्षा–टॅक्सी व ई–बाईक सेवा आता सरकारकडून सुरु केली जाणार आहे. महाराष्ट्र सरकार आता ओला आणि उबेरला टक्कर देणार आहे. त्यासाठी लवकरच मोबाईल अॅप लाँच केले जाणार असून आता लवकरच प्रवाशांना एसटी महामंडळाची रिक्षा आणि ई–बाईक सेवा**



मिळणार आहे. याबाबत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोठी घोषणा केली आहे. पान २ वर

## सरकारी बाबूंना सोशल मिडियासाठी नवी नियमावली

**मुंबई । प्रतिनिधी**

**शासकीय कर्मचाऱ्यांच्या सोशल मीडिया वापरासाठी शासनाकडून नवी नियमावली जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे सोशल मिडियावर सक्रिय असणाऱ्या सरकारी बाबुंसाठी हा मोठा धक्का आहे.**

गोपनीय शासकीय माहितीचा प्रसार करणे, खोट्या गोष्टी सोशल मीडियाद्वारे पसरविणे, शासकीय नियमांचे उल्लंघन करून समाज माध्यमांवर प्रतिक्रिया व्यक्त करणे यासह अनेक बाबी टाळण्यासाठी शासनाकडून नव्याने सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत. शासकीय सूचनांचे पालन न केल्यास कर्मचाऱ्याला शिस्तभंग कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाकडून नव्या सूचनांचे परिपत्रक जाहीर करण्यात आले आहे.

## बीडमध्ये तरुणावर कोयत्याने हल्ला

बीड । प्रतिनिधी

हातात कोयते आणि सत्तुर घेऊन एका तरूणाला त्याची भिती दाखवत नंतर त्याच कोयता आणि सत्तुरने त्याच्यावर हल्ला केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे चारते पाच गुंडांनी रस्त्यावर अडवून त्यातरूणाला मारहाण करत असल्याचा व्हिडीओ देखील बनवला आहे. या हल्ल्यात तरूण गंभीररित्या जखमी झाला असून त्याच्यावर खाजगी रूग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली. शहरातील तेलगाव नाका भागातील शेख असीम अनिस (वय २४)हा तेलगाव नाका परिसरातून जात पान २ वर

## तीन आजारांना मोफत उपचाराच्या यादीतून वगळले

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

केंद्र सरकारच्या आयुष्मान भारत योजनेअंतर्गत आयुष्मान कार्ड असणा–या रुग्णांवर सरकारकडून रुग्णाचा ५ लाखांपर्यंत खर्च उचलला जातो. मात्र, आता काही बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार आता काही आजारांवर खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार करता येणार नाहीत. यामध्ये मेंदू, प्रसुती आणि गर्भाशय शस्त्रक्रिया याचा समावेश आहे. नव्या नियमावलीनुसार आयुष्मान योजनेअंतर्गत हे आजार असलेल्या रुग्णांना शासकीय रुग्णालयातच उपचार घ्यावे लागणार आहेत. सरकारी रुग्णालयात याबाबत सुविधा असल्याने निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार आयुष्मान योजनेअंतर्गत पान २ वर

# अखेर माणिकराव कोकाटेंना अभय?

## अजितदादांच्या विधानाने वेगवेगळ्या चर्चांना उधाण!

**मुंबई । प्रतिनिधी**



कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याविषयी माध्यमांना सांगण्याचे काहीच कारण नाही, ज्या वेळी निर्णय होईल त्यावेळी सांगितले जाईल, असे विधान उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केल्याने आता कोकाटे यांना पवारांचे अभय आहे की काय? असा पान २ वर


### नेमकं काय म्हणाले अजित पवार?

कोकाटे यांच्या राजीनाम्याविषयी माध्यमांना सांगण्याचे काही कारण नाही. ज्यावेळी मी निर्णय घेईल तेव्हा तो जाहीर केला जाईल, असे अजित पवार म्हणाले. तसेच आमचे निर्णय काय व्हावेत हे राज्याचे मुख्यमंत्री आणि आम्ही ठरवू. तसेच मंत्रिमंडळात कोण असावे आणि कोण नसावे हे ठरवण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांचा आहे. त्यामुळे तो त्यांचा अधिकार आहे, असे अजित पवार म्हणाले.

## ऐतिहासिक दीपमाळ परिसराला बीड पालिकेने केले डम्पिंग ग्राउंड

**बीड । प्रतिनिधी**

**विचारात ऐतिहासिक वारसा असलेल्या खंडेश्वरी दीपमाळ या परिसरात सध्या नगरपालिकेने बीड शहरातील कचरा साठवणे आणि टाकण्यासाठी डम्पिंग ग्राउंड केले असल्याचे दिसून येत आहे शहरभरातील कचरा या परिसरात टाकला जात असल्याने दुर्गंधी पसरली आहे.**



बीड शहरात असलेल्या खंडेश्वरी दीपमाळ आणि खंडोबा मंदिर याला ऐतिहासिक वारसा आहे हा ऐतिहासिक वारसा पुरातत्व विभागाने देखील जपला आहे मात्र या परिसरामध्ये शिष्यवृत्तीकरण करण्यासाठी वृक्ष लागवड करण्यात आली होती सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेऊन हा परिसर स्वच्छ सुंदर आणि निसर्गरम्य व्हावा यासाठी प्रयत्न सुरू केलेले असतानाच बीड शहरातील कचरा मात्र या परिसरात टाकला जात आहे दीपमाळ परिसरालगतच औद्योगिक वसाहत आणि नागरी वसाहत देखील आहे प्रामुख्याने मध्यंतरी बिंदुसरा नदीचे शुद्धीकरण पान २ वर

# आरोग्य विभागातही कर्मचाऱ्यांचे वेतन होणार वेळेत

## खा.सोनावणे यांच्या पत्रानंतर दिलासा

**बीड । प्रतिनिधी**

**राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत सर्व स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांचे समायोजन व वेतन विहित वेळेत होत नसल्याबाबत अनेक तक्रारी खा.बजरंग सोनवणे यांच्याकडे आल्या होत्या. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने खा.सोनवणे यांनी आरोग्य विभागाला तातडीने प्रश्न सोडवण्याबाबत पत्र दिल्यानंतर आरोग्य संचालक यांनी जून अखेरपर्यंत वेतन आदा करण्याचे आदेश दिले आहेत.**



राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत बीड जिल्ह्यातील उपकेंद्र, प्रा.आ.केंद्र, उपजिल्हा रुग्णालय, स्त्री रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, जिल्हा रुग्णालय तसेच प्रशासकीय स्तरावर विविध स्तरावर संवर्गनिहाय अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांचे वेतन वेळेत होत नसून दोन तिन महिन्यांचे वेतन झाले नसल्याच्या तक्रारी खा.सोनवणेंकडे आल्या होत्या. त्यांनी तातडीने आरोग्य विभागाला पत्र देवून प्रश्न सोडवावे, असे म्हटले होते. यानंतर आरोग्य संचालक यांनी पत्र काढले असून यात म्हटले आहे, दि.१४ मार्च २०२४ शासन निर्णयानुसार समायोजन व विहीत वेळेत वेतन देणेबाबत राष्ट्रीय आरोग्य अभियान, अधिकारी व कर्मचारी महासंघ महाराष्ट्र राज्य, शाखा बीड यांच्याकडून विनंती करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी १० वर्षेपेक्षा व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या अधिकारी/कर्मचारी बाबतची कार्यवाही सदयस्थितीत शासनस्तरावर सुरु आहे. त्याचप्रमाणे राज्य कार्यालयातील वित्त विभागाकडून मंजूर प्रकल्प अंमलबजावणी पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२८ जुलै २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८८.०० क्विंटल | २,०३० | २,८०१ | २,५९५ |
| ज्वारी/हायब्रिड: ९५.५० क्विंटल | १,९०० | २,८०० | २,३८६ |
| मका/लोकल:१२.५० क्विंटल | २,०२० | २,२८० | २,१५० |
| तूर : २२.०० क्विंटल | ६,००० | ६,५२४ | ६,२६२ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: १०९.०० क्विंटल | २,०६० | २,८८४ | २,५८७ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: ३.५० क्विंटल | ४,४०० | ४,४०० | ४,४०० |
| हरभरा: २२.०० क्विंटल | ५,६६० | ६,६८० | ६,०१८ |

cmyk

अग्रलेख

# तर सहकार पुन्हा ग्रामीण समृद्धीचा कणा बनावा

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली भारत सरकारने २५ जुलै रोजी राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ जाहीर केले. हे राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ हे २०४५ पर्यंत ग्रामीण रोजगार आणि सहकारी संस्थांच्या आर्थिक योगदानाला चालना देण्यासाठी तयार केले आहे. शहा यांनी सांगितले की, हे धोरण सर्वसामान्य व्यक्तीला केंद्रबिंदू मानते आणि २०३४ पर्यंत देशांतर्गत उत्पन्नात सहकार क्षेत्राचा वाटा तिप्पट होईल. धोरणात प्राथमिक कृषी सहकारी संस्था, सहकारी विद्यापीठ, डिजिटलायझेशन आणि मल्टिस्टेट सहकारी संस्थांना प्रोत्साहन यासारख्या उपाययोजना समाविष्ट आहेत. याशिवाय, सहकारी संस्थांसाठी 'इज ऑफ डूइंग बिजनेस' साठी कायदेशीर सुधारणा आणि प्रशासकीय पारदर्शकता यावर भर देण्यात आला आहे.

''महाराष्ट्र आणि गुजरातमधील सहकार चळवळीला व्यापक स्वरूप आहे. केंद्राने सहकार मंत्रालय स्थापन करताना महाराष्ट्राचा नक्कीच विचार केला असेल. सहकारी संस्थांना स्वायत्तता आणि पारदर्शकता मिळाल्यास त्यांचा खऱ्या अर्थाने जनाधार वाढेल. दुसरीकडे, काहींनी चिंता व्यक्त केली आहे की, सहकारी संस्थांमधील राजकीय हस्तक्षेप कमी न झाल्यास धोरणाचे लाभ मर्यादित राहतील. सहकारी संस्थांचे खासगीकरण आणि राजकीय दबाव यामुळे स्थानिक नेत्यांची पकड ढिली होत आहे, ज्याचा परिणाम सहकारी संस्थांच्या स्वायत्ततेवर होऊ शकतो. पश्चिम महाराष्ट्रात सहकार चळवळीने साखर कारखाने, दूध संघ, वस्त्राद्योग आणि सहकारी बँकिंग यांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी दिली आहे. राज्यभरातील २०० हून अधिक सहकारी साखर कारखान्यांपैकी ४० तोट्यात आहेत, तर २५-४५ टक्के सहकारी दूध संघ आणि पतपेढ्या आर्थिक अडचणीत आहेत. नवीन धोरणात डिजिटलायझेशन आणि सहकारी विद्यापीठाच्या स्थापनेला प्रोत्साहन दिले आहे, ज्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखाने आणि दूध संघांना आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करता येईल. जसे इथेनॉल निर्मितीला प्रोत्साहनामुळे साखर कारखान्यांना नवीन उत्पन्नाचे स्रोत मिळत आहेत. सहकारी बँकिंग आणि पतपेढ्यांमधील गैरव्यवहार कमी करण्यासाठी कायदेशीर सुधारणा आणि पारदर्शक व्यवस्थापनाला प्रोत्साहन दिले आहे. पण सहकार विभाग किंवा रिझर्व्ह बँक यापैकी एकच कोणीतरी नियंत्रण ठेवावे या मागणीकडे मात्र सरकारने दुर्लक्ष केल्याचे दिसून आले आहे. सहकार विशेषत: अर्बन अपेक्स बँकेच्या निमित्ताने एकत्र आलेल्या सहकारी अर्बन बँकिंग क्षेत्रातील मंडळींनी मांडलेला हा विचार त्यांच्या विचाराचे सरकार येऊनही प्रत्यक्षात उतरू शकलेला नाही. मल्टिस्टेट सहकारी संस्थांना प्रोत्साहनामुळे संपूर्ण देशभरात बँकिंगला, तर दूध आणि वस्त्राद्योग क्षेत्रातील संस्थांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विस्ताराची संधी मिळेल. तथापि, तोट्यातील संस्थांसाठी पुनरुज्जीवन निधी आणि राजकीय हस्तक्षेप रोखण्यासाठी कठोर कायदे यांचा अभाव आहे. मल्टिस्टेट सहकारी संस्थांना प्रोत्साहन देणारा २००२ चा कायदा यापूर्वीच लागू आहे, परंतु त्याची अंमलबजावणी अपुरी राहिली आहे.

सगळेच काही मनासारखे होणार नसले तरी राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ चे स्वागत करावे, कारण ते सहकारी संस्थांना आधुनिक आणि स्पर्धात्मक बनवण्याच्या दिशेने पाऊल टाकते. तथापि, पश्चिम महाराष्ट्राच्या संदर्भात काही बदल आवश्यक आहेत. यामध्ये साखर कारखाने आणि पतपेढ्यांना पुनरुज्जीवनासाठी विशेष निधी आणि तांत्रिक सहाय्य द्यावे. सहकारी संस्थांच्या निवडणुका आणि व्यवस्थापनात राजकीय हस्तक्षेप रोखण्यासाठी स्वतंत्र देखरेख समिती स्थापन करावी. पश्चिम महाराष्ट्रातील साखर आणि दूध क्षेत्राच्या विशिष्ट गरजांसाठी स्थानिक स्तरावर धोरणाची अंमलबजावणी करावी. कर्मचाऱ्यांना डिजिटल तंत्रज्ञान आणि आधुनिक व्यवस्थापनाचे प्रशिक्षण द्यावे. अमूल आणि प्रवरानगर सहकारी साखर कारखान्याच्या यशस्वी उदाहरणांचा विचार करता, धोरण योग्य अंमलबजावणीसह यशस्वी होऊ शकते. स्थानिक पातळीवरील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी, केंद्र आणि राज्य सरकारने समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. सहकारी संस्थांना आर्थिक आणि तांत्रिक सहाय्य, राजकीय हस्तक्षेपापासून मुक्ती आणि बाजारपेठेतील स्पर्धेसाठी सक्षम केल्यास, सहकार चळवळ पुन्हा एकदा ग्रामीण समृद्धीचा कणा बनू शकते.

## जि.प.च्या पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे यांनी पदभार स्वीकारला



**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषदेच्या पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ज्ञानोबा मोकाटे यांची बदली झाल्याने त्यांच्या जागी उप मुख्य कार्यकारी अधिकारी किशोर काळे हे बदलून आले आहेत. यांनी दि. २४ जुलै २०२५ रोजी पदभार कार्यभार स्वीकारला.**

महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाने दिनांक १४ जुलै रोजी उप मुख्य कार्यकारी अधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याच्या बसल्याचे आदेश काढले होते. त्यामध्ये काळे यांची बदली बीड येथे करण्यात आली होती. त्यानुसार दिनांक २४ रोजी किशोर काळे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे रुजु अर्ज केल्याने त्यांना रुजु करून करून घेण्यात आले आहे. तर नांदेड जिल्ह्यात किनवट येथे बदली झाल्याने डॉ.मोकाटे यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे. काळे हे शिस्तप्रिय आणि कार्यतत्पर अधिकारी म्हणुन ओळखले जातात. जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी कृषी अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी अशोक राठोड यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## वाघिरा महोत्सवात रंगणार मल्लयुद्ध, राष्ट्रीय पदक विजेत्या खेळाडूंचा होणार सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

मौजे वाघीरा, तालुका पाटोदा येथे वै. ह. भ . प.गुरुवर्य श्री संत सितारामबाबा यांच्या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन सालाबादाप्रमाणे या वर्षी गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले असून, त्याची सांगता दिनांक ३० जुलै रोजी भगवानगडाचे महंत न्यायाचार्य ह भ प श्री नामदेव महाराज शास्त्री यांच्या सुश्राव्य काल्याच्या कीर्तनाने व महाप्रसादाने होणार आहे. यानिमित्त गावातील बजरंग क्रीडा मंडळ व व्यायामशाळा यांच्यावतीने वाघीरा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यावेळी वाघीरा महोत्सवामध्ये जंगी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.वाघीरा गाव हे बालाघाटावरील पैलवान व खेळाडूंसाठी प्रसिद्ध आहे. या गावातील कबड्डी व कुस्तीचे राष्ट्रीय खेळाडू हरिभाऊ बांगर यांनी १९९५ सली गावातील व पंचक्रोशीतील युवक निर्व्यसनी राहावेत, खेळ आणि खेळाडूंच्या माध्यमातून जास्तीत जास्त संख्येने शासकीय सेवेत दाखल व्हावेत, या उद्देशाने क्रीडा मंडळाची स्थापना केलेली आहे. क्रीडा मंडळ आयोजित यावर्षीचा वाघीरा महोत्सव हा परंपरेने २९ व्या वर्षांमध्ये पदार्पण करत आहे. क्रीडा मंडळाच्या माध्यमातून आजपर्यंत श्री फुलचंद बांगर आंतरराष्ट्रीय स्तरावरील पदक विजेते तथा महाराष्ट्र शासनाचा मानाचा शिवछत्रपती पुरस्कार विजेते ठरलेले आहेत. त्याचबरोबर राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत वैजनाथ बांगर, विलास बांगर, महेश घुले यांनी पदके प्राप्त केली आहेत. बॉक्सिंग क्रीडा प्रकारात कुंडलिक बांगर यांनी राष्ट्रीय पदक प्राप्त केले आहे. वाघीरा गावाने खेळाची परंपरा हरिभाऊ बांगर यांच्या माध्यमातून जोपासलेली आहे. मागील २८ वर्षापासून वाघीरा महोत्सवाच्या माध्यमातून कबड्डी, बैलगाडा शर्यत, कुस्ती, रस्सीखेच अशा विविध स्पर्धांचे आयोजन करून पंचक्रोशीतील युवक युवतींना एक हक्काचे व्यासपीठ खेळासाठी उपलब्ध करून दिलेले आहे. मागील २८ वर्षापासून राष्ट्रीय खेळाडू हरिभाऊ बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली बजरंग क्रीडा मंडळातील अनेक खेळाडूंनी महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाच्या विविध विभागांमध्ये आपल्या कौशल्याद्वारे शासकीय विभागात प्रवेश मिळवला आहे. त्या ठिकाणी उत्कृष्ट कार्याच्या माध्यमातून ही परंपरा पुढे चालवण्याचे काम हे खेळाडू करत आहेत. यावर्षी क्रीडा मंडळाने राज्यस्तरीय कुस्त्यांचे आयोजन केलेले आहे. यासाठी राज्यातील पुरुष व महिला पैलवान मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. महोत्सवाचे उद्घाटन समाजभूषण पुरस्कार प्राप्त उद्योजक श्री नितीन कोटेचा यांच्या शुभहस्ते होणार आहे, या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा राज्य कार्यकारिणी सभासद श्री सर्जेराव तांदळे, पाटोदा तालुक्यातील अभ्यासू नेते, महेंद्र गर्जे, आप्पासाहेब राख, मधुकर गर्जे, उद्योगपती अनुरथ सानप वडझरी, पोलीस अधिकारी प्रवीणकुमार बांगर गेवराई, बीड जिल्ह्यातील प्रसिद्ध डॉ सुरेश मुंडे रेणु हॉस्पिटल बीड, उद्योगपती बप्पासाहेब घुगे गोल्डन हॉटेल बीड, यांची उपस्थिती राहणार आहेत. वै. गुरुवर्य श्री संत सितारामबाबा अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता व महाप्रसादाचे वाटप झाल्यानंतर दुपारी ३ वाजता कुस्त्यांचे सामने रंगणार आहेत. ''चौकट संस्थापक अध्यक्ष हरिभाऊ बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली २८ वर्षापासून पंचक्रोशीतील, गावातील उत्कृष्ट कामगिरी करणारे खेळाडू यांचा सन्मान करण्यात येतो,यावेळी क्रीडा मंडळाचे गुरुवर्य प्रा.दगडू चव्हाण सर, राष्ट्रीय स्पर्धेत रौप्य पदक पटकावल्याबद्दल क्रीडा मंडळाचे खेळाडू पैलवान प्राध्यापक महेश घुले सर, जागतिक दर्जाचे आरोग्य प्रशिक्षण देण्याची कामगिरी केल्याबद्दल शिवाजी गोपाळघरे व श्रीकृष्ण बांगर यांचा सन्मान यावेळी करण्यात येणार आहे. या वाघिरा महोत्सवासाठी जिल्ह्यातील व बालघाटावरील क्रीडाप्रेमी, कुस्तीप्रेमी, खेळाडू,वस्ताद मंडळी आणि नागरिक यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित रहावे असे आवाहन बजरंग क्रीडा मंडळ व्यायाम शाळेचे संस्थापक अध्यक्ष हरिभाऊ बांगर,उद्धव बावणे लक्ष्मण विघ्ने, ज्ञानेश्वर भोसले, बिभीषण बांगर, वैजनाथ बांगर, महेश घुले, सुंदर बांगर, फुलचंद बांगर, कुंडलिक बांगर, विलास वाघमारे, डॉ.सुरज बांगर,डॉ. पवन बांगर,डॉ विकास नागरगोजे, डॉ. महेंद्र बांगर, डॉ. कु.पायल बांगर, आजिनाथ उर्फ (दादा) बांगर, रवींद्र बांगर,अमर बांगर, गणेश बावणे, प्रवीण आजबे, अजिंक्य बांगर,भाऊसाहेब बांगर, कृष्णा बांगर, जयराम बांगर, चांगदेव विघ्ने यांनी केले आहे.

# लोककलेची परंपरा जोपासणाऱ्या टिपरे महोत्सवासाठी गेवराई सज्ज

## टिपरे, सोंग आणि भोलोबा गीत स्पर्धेत सहभागी होवुन टिपरे महोत्सव यशस्वी करा-आ.विजयसिंह पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

**गेवराई शहराला टिपरे आणि सोंग या लोककलेची सुमारे शंभर वर्षाची परंपरा लाभली आहे. या लोककलेची परंपरा जोपासण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातुन दरवर्षी नागपंचमीच्या निमित्ताने भव्य टिपरे महोत्सवाचे आयोजन केले जाते. यावर्षी बुधवार दि. ३० जुलै रोजी सायं. ६ वा. बाजार तळ, गेवराई येथे टिपरे महोत्सवाचे आयोजन केले असुन या निमित्ताने होणाऱ्या स्पर्धांमध्ये सहभागी होवुन टिपरे महोत्सव यशस्वी करण्याची आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नांमुळे खऱ्या अर्थाने या लोककलेला राजाश्रय मिळाला आहे.**

गेवराई शहरातील गल्लो-गल्लीमध्ये सध्या टिपऱ्यांचा सराव होतांना दिसत आहे, शंभर वर्षांची परंपरा लाभलेली ही लोककला मधल्या काळात लोप पावत होती. आ. विजयसिंह पंडित यांनी या लोककलेला राजाश्रय देवुन ती परंपरा जोपासण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. सुमारे १ लाख २७ हजार रुपयांची रोख पारितोषिके व सन्मानचिन्ह देवुन त्यांनी स्पर्धात्मक दृष्टीकोणातुन या कलेला नवसंजवणी देण्याचा प्रयत्न केला आहे. बुधवार दि. ३० जुलै रोजी सायं. ६ वा. बाजार तळ, गेवराई येथे यावर्षी टिपरे महोत्सवाचे आयोजन केले आहे. महिलांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेवुन त्यांच्यासाठी वेगळी बैठक व्यवस्था या निमित्ताने करण्यात आली आहे. दरवर्षी या महोत्सवाला प्रेक्षकांचा विशेषत: महिलांचा प्रतिसाद वाढत आहे. यावर्षीचा टिपरे महोत्सव यशस्वी करण्यासाठी टिपरे, सोंग आणि भोलोबा गीत स्पर्धेत जास्तित जास्त सहभाग नोंदविण्याचे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. टिपरे महोत्सवात सांघिक टिपरे स्पर्धेतील प्रथम विजेत्याला ३३,३३३ रु. रोख,



व्दितीय २२,२२२ रु., तृतीय ११,१११ रु. आणि प्रत्येकी ५,५५५ रु. दोन उत्तेजनार्थ पारितोषिक दिले जाणार आहेत. टिपरे संघातील उत्कृष्ट पात्र सजावट सादरीकरणासाठी प्रथम ५००० रु, व्दितीय ३००० रु., तृतीय २००० रु. आणि १००० रु. एकुण सहा लक्षवेधी पारितोषिके दिली जाणार आहेत. उत्कृष्ट सोंगधारी कलावंतास प्रथम ५००० रु, व्दितीय ३००० रु., तृतीय २००० रु. आणि १५०० रु. प्रत्येकी दोन उत्तेजनार्थ पारितोषिके दिली जाणार आहेत. उत्कृष्ट वाद्यवादन वैयक्तीक विजेत्यांना प्रथम ३००० रु, व्दितीय २००० रु., तृतीय १५०० रु. आणि १००० रु. एकुण दोन उत्तेजनार्थ पारितोषिके दिली जाणार आहेत. भोलोबा (फेर) गीत स्पर्धेतील विजेत्यांसाठी प्रथम ५००० रु, व्दितीय ३००० रु., तृतीय २००० रु. आणि १००० रु. एकुण दोन उत्तेजनार्थ पारितोषिके दिली जाणार आहेत. सर्व विजेत्यांना आकर्षक सन्मानचिन्ह मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. आ. विजयसिंह पंडित यांनी आयोजित केलेल्या टिपरे महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी गेवराई शहरातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु, तहसिलदार संदिप खोमने, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, पोलीस निरीक्षक प्रविणकुमार बांगर यांच्यासह मान्यवर या प्रसंगी उपस्थित राहणार आहेत. महोत्सव यशस्वी करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशिल असलेले जेष्ठ कलावंत ॲड. सुभाष निकम, प्रकाश भुत्ते, शाहीर विलास सोनवणे, विष्णूप्रसाद खेत्रे, प्रशांत रुईकर हे परिक्षक म्हणुन काम पाहणार आहेत. टिपरे महोत्सवात सहभाग नोंदवुन गेवराई शहराला लाभलेली शंभर वर्षाची लोककला जोपासण्याचे काम सर्वांनी मिळुन करावे असे आवाहन आ. विजयसिंह पंडित यांनी केले.

# पान १ वरून...

### पहिल्या श्रावणी सोमवारी जिल्ह्यातील

असलेल्या परळीतील प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी देशभरातून मोठ्या संख्येने भाविक परळीत डेरेदाखलझाले. दुपारी बारा वाजेपर्यंत ५० हजारापेक्षाजास्त भाविकांनी प्रभू वैद्यनाथाचेभक्तीभावाने दर्शन घेतले. त्यासह बीड जिल्ह्यातील कपीलधार, सौताडा,कंकालेश्वर, गोरक्षनाथ टेकडी, सोमेश्वरया सह जिल्ह्यातील शिवालयांमध्ये भाविकांची गर्दी पहावयास मिळाली.

----------

### जीएम बियाणांवरुन

नियंत्रण ठेवण्यात अपयश आल्याचा आरोप केला आहे. सध्या अमेरिका आणि भारत यांच्यात सुरू असलेल्या व्यापार चर्चांदरम्यान अमेरिका जीएम सोयाबीन व मक्याला भारतात विक्रीची परवानगी देण्याचा आग्रह धरत आहे, परंतु भारताने ती परवानगी नाकारली पाहिजे. तसेच शेतीमधील रसायनांचा वापर आरोग्यासाठी घातक ठरत आहे. त्यामुळे अनेक आजार बळावत आहेत, असेही संघाने नमूद केले आहे. तर दुसरीकडे संसदेमध्ये सुध्दा काही खासदारांनी जीएम बियाणांना भारतात परवानगी दिली तर शेतकऱ्यांना चांगले दिवस येतील, असे म्हणणे आहे. त्यामुळे जीएम बियाणांना विरोध होत असला तरी दुसऱ्या बाजूने समर्थन सुध्दा केले जात आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात जीएम बियाणांवर देशात घमासान झाले तर नवल वाटायला नको.

-----------

### वसतिगृहातील मुलींसोबत

यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. कदीम जालना पोलिसांनी प्रमोद खरात याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता ७४, ७५, पोस्को कायदा ८, १०, १२ आणि बालन्याय अधिनियम ७५ कलमान्वये गुन्हा दाखल करून, त्याला अटक केली आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आरती जाधव करीत आहेत. तसेच जालन्याच्या पालकमंत्री या महिला असल्याने या प्रकरणाची पंकजाताई मुंडे दखल घेतात का? हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

-------------

### बीडमध्ये तरुणावर

असतांना चार ते पाच गुंडांनी त्याला अडवले. हातात सत्तुर आणि कोयता घेऊन आधी त्याला भिती दाखवण्याचा प्रयत्न केला आणि त्यानंतर शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकी देत हातातील धारदार शस्त्रांनी त्याच्यावर हल्ला केला. यामध्ये शेख असीम याच्या हाताला गंभीर दुखापत झाली असून त्याला दि.२४ जुलै रोजी बीडच्या जिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर त्याला खाजगी रूग्णालयात रेफर करून त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली.दरम्यान मारहाणीचा व्हिडीओ देखील व्हायरल झाला झाला असल्याची चर्चा आहे या प्रकरणाला पाच दिवस झाले तरीही पोलीसांनी अद्याप गुन्हा दाखल झालेला नसल्याचे समजते.

-----------

### एसटी देणार ओला,

राज्य सरकारने मराठी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी ॲप आधारित प्रवासी वाहनसेवा सुरू करण्याची योजना आखत आहे. प्रवासी वाहतुकीसाठी ॲप आधारित रिक्षा, टॅक्सी व ई-बाईक सेवा आता खासगी कंपन्यांपुरती मर्यादित न राहता, परिवहन विभागाच्या सहकार्याने सुरू करण्यात येणाऱ्या या ॲपला जय महाराष्ट्र, महा - राईड, महा-यात्री, महा-गो यापैकी एखादे नाव देणे प्रस्तावित असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी अशी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांच्या अंतिम मान्यतेने सदर शासकीय ॲप लवकरच कार्यान्वित होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या उपक्रमाअंतर्गत ॲप विकसित करण्यासाठी 'महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सपोर्ट टेक्नॉलॉजी' आणि 'मित्र' या संस्थेसह खासगी कंपन्यांशी चर्चा सुरू करण्यात आली आहे. यंत्रणेत पारदर्शकता ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींचा समावेश यात असून लवकरच ॲप तयार होणार आहे असे सरनाईक म्हणाले. केंद्र सरकारच्या ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्वानुसार या ॲपची नियमावली अंतिम टप्प्यात आहे. सध्या खाजगी संस्था अनाधिकृत ॲपच्या माध्यमातून प्रचंड नफा कमवतात. त्यासाठी त्या कंपन्या चालक व प्रवासी यांची लूट करीत आहेत. सरकारकडे यंत्रणा, तंत्रज्ञान आणि मनुष्यबळ मुबलक प्रमाणात असल्यामुळे शासनाने असे ॲप विकसित केल्यास त्याचा फायदा प्रवाशांच्या बरोबर चालकांना देखील होईल. या संदर्भात ५ ऑगस्ट रोजी मंत्रालयात संबंधितांची बैठक आयोजित केली आहे. या बैठकीला आमदार प्रवीण दरेकर तसेच या ॲप निर्मितीचे तंत्रज्ञ व शासकीय अधिकारी उपस्थित असतील, त्यामुळे या बैठकीत या शासकीय ॲपला अंतिम स्वरूप देण्यात येणार आहे. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

**बेरोजगारांना रोजगार, वाहन खरेदीसाठी कर्ज**

या माध्यमातून मराठी तरुण- तरुणींना विशेष आर्थिक पाठबळ देण्यात येणार आहे. बेरोजगार तरुण-तरुणींना रोजगार देण्यासाठी मुंबई बँकेच्या माध्यमातून वाहन खरेदीसाठी १० टक्के व्याजदराने कर्ज दिले जाणार आहे, अशी ग्वाही मुंबै बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी दिली. तसेच अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ, भटके विमुक्त महामंडळ, ओबीसी महामंडळ आणि एमएसडीसी या संस्थांतर्फे ११ टक्के व्याज परतावा अनुदानाच्या स्वरूपात दिला जाणार आहे. त्यामुळे हे कर्ज बिनव्याजी असल्यासारखे आहे, असे दरेकर म्हणाले.

--------------------

### वडवणीत चोरट्याचा

कॅमेराचे सीडीआर स्टोरेज व पाच ते दहा हजार रुपये नगदी कॅश अज्ञात चोरट्यांनीचोरून नेण्याची घटना रात्री घडली आहे.याप्रकरणी वडवणी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेथ हॉटेल मालक संजय बडे त्यांच्याशी विचारपूस करत पंचनामा केला आहे.

------------

### अखेर माणिकराव कोकाटेंना

प्रश्न उपस्थित केला जात आहे. पावसाळी अधिवेशन चालू असतानाकृषिमंत्री माणिकराव कोकाटे सभागृहात ऑनलाईन रमी खेळताना दिसले होते. त्यांच्या या कृतीचा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला. अजित पवार यांनी माझी आणि कोकाटे यांची २८ किंवा २९ जुलै रोजी भेट होईल. या भेटीत सभागृहात घडलेला प्रकार नेमका काय आहे? याबाब मी त्यांना विचारेन. त्यांच्याशी चर्चा करून पुढील निर्णय घेण्यात येईल, असे याआधी अजित पवार यांनी सांगितले होते. मात्र त्यांनी पुन्हा शब्द फिरवल्याचे दिसत असून कोकाटे यांच्या राजीनाम्याविषयी माध्यमांना सांगण्याचे काही कारण नाही. ज्यावेळी मी निर्णय घेईल तेव्हा तो जाहीर केला जाईल, असे अजित पवार म्हणाले. तसेच आमचे निर्णय काय व्हावेत हे राज्याचे मुख्यमंत्री आणि आम्ही ठरवू, असेही ते म्हणाले. अजितदादांच्या याच विधानामुळे कोकाटेंना अभय देण्यात येत आहे की काय? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

---------

### तीन आजारांना मोफत

खाजगी रुग्णालयांमध्ये मेंदू, प्रसूती आणि गर्भाशय शस्त्रक्रिया केली जात होती. मात्र, आता यापुढे या तीन आजारांवर उपचार आणि शस्त्रक्रिया फक्त सरकारी दवाखान्यांमध्येच केली जाणार आहे. खाजगी रुग्णालयांमध्ये या उपचारांसाठी आता पैसे मोजावे लागणार आहेत. त्यामुळे आता काही रुग्णांची अडचण वाढण्याची शक्यता आहे.आयुष्मान भारत योजनेअंतर्गत पूर्वी खाजगी आणि सरकारी रुग्णालयांमध्ये १७६० आजारांवर मोफत उपचार केले जात होते. मात्र, आता काही आजारांना खाजगी रुग्णालयांमधील मोफत उपचारांच्या यादीतून वगळण्यात आले आहे. सरकारी रुग्णालयांमध्ये या आजारांवर उपचार उपलब्ध असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

---------

### ऐतिहासिक दीपमाळ परिसराला

आणि स्वच्छतीकरण करण्यात आले असले तरी बीड शहराने या भागातील कचरा मात्र दीपमाळ परिसरामध्ये दिसत असल्याने नागरिकाकडून रोष व्यक्त केला जात आहे नगरपालिकेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी या बाबीकडे लक्ष देऊन हा परिसर स्वच्छ कसा राहील याची दक्षता घ्यावी अशी मागणी बीड शहरातील नागरिकाकडून आणि इतिहास प्रेमी कडून होत आहे

-------------

### आरोग्य विभागातही कर्मचाऱ्यांचे वेतन

आराखडा नुसार जिल्हा, परिमंडळ, महानगरपालिका व इतर सर्व आरोग्य संस्था यांना राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणी निधी वितरीत करण्यात येतो. सदर वितरीत निधी मधुन राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे मानधन त्या- त्या स्तरावर अदा करण्यात येते तथापि, केंद्र शासनाकडून निधीची तरतूद उपलब्ध न झाल्यामुळे जिल्हयांना निधी वितरीत करण्यात आला नाही, त्यामुळे कार्यरत अधिकारी/कर्मचा-यांचे मागील २-३ महिन्यांचे मानधन प्रलंबित होते. या कार्यालयाच्या दि.१५ जुलै २०२५ रोजीच्या पत्रान्वये जुन, २०२५ अखेरपर्यंतच्या प्रलंबित मानधनाकरिता या कार्यालयातील वि: विभागामार्फत जिल्हा, परिमंडळ, महानगरपालिका, प्रशिक्षण केंद्र व इतर सर्व संबंधित कार्यालयाना वित्तीय मर्यादा वितरीत करण्यात आली आहे. तसेच सदर वितरीत करण्यात आलेली वित्तीय मर्यादा ही केवळ प्रलंबित मानधनासाठीच खर्च करणे अनिवार्य असल्याबाबत्त सुचना संबंधितांना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत, असे म्हटले आहे.

---------------

### गळकी शाळा:जिल्हा परिषदेच्या

होते तर याच दुर्घटनेत नऊ विद्यार्थी गंभीर जखमी झाली होती या घटनेमुळे राज्यातील जिल्हा परिषद शाळेच्या सुरक्षितेचा मुद्दा ऐरणीव लागला संबंधित मंत्र्यांनी सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले असले तरी बीड जिल्ह्यातील शाळांची अवस्था मात्र गंभीरच आहे बीड जिल्ह्यात जिल्हा परिषदेला ९४ शाळा इमारतीची गरज आहे ३८१ जिल्हा परिषद शाळा मधील ६०७ वर्ग खोल्याचे दुरुस्ती गरजेचे आहे तर १४७ नवीन वर्ग खोल्या बांधणे गरजेचे आहे असे असताना अध्यापही त्यावर कोणताच निर्णय झाला नाही बीड जिल्ह्यातील वांगी तालुका बीड येथील या शाळेचे उदाहरण आहेत भर पावसात या शाळेचे पत्रे तुटल्याने पाणी थेट वर्गामध्ये येत आहे विद्यार्थी कसेबसे पाण्यापासून सुरक्षित होतील मात्र काळजी घेणाऱ्या शिक्षकांना हातात पेन्सिल कडू ऐवजी पाणी साठवण्यासाठी पाटी आणि हातात झाडू घ्यावा लागत आहे ही दुरावस्था बीड जिल्ह्यातील बऱ्याच जिल्हा परिषद शाळेची आहे.

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. २९ जुलै २०२५






आष्टी : नगर येथील रवी सिंग यांच्या नवीन अत्याधुनिक डीएमएलएस सिद्धी विनायक डेंटल लॅबच्या उद्‌घाटन प्रसंगी सपत्नीक सत्कार करताना कवी प्रा.सय्यद अल्लाउद्दीन, चिरंजीव डॉ.सय्यद हुमायुद्दीन, डॉ.सय्यद वलीयुद्दीन

## थोडक्यात...

### मराठवाडा अध्यक्षपदी - सुखदेव घोडे यांची नियुक्ती

परतूर । प्रतिनिधी



दैठणा ता.परतुर येथील सामाजिक कार्यकर्ते सुखदेव घोडे हे दहा वर्षापासून जालना जिल्ह्यात काम करत असतात. त्यांनी लहू क्रांती संघर्ष सेना या सामाजिक संघटनेच्या संघटक विठ्ठल नाटकर यांच्याशी चर्चा केली की मी दहा वर्षे परतुर तालुक्यातून जालना जिल्ह्यात समाजाचे काम करत असतो पण मला सामाजिक चळवळीची खूप आवड आहे आणि मला चळवळीत समाज कार्य करायचा आहे मग त्यांनी संघटनेचे अध्यक्ष राजू जी कसबे यांच्याशी संपर्क करून चर्चा केली आणि समाजाची आवड बघता संघटनेचे अध्यक्ष राजूजी कसबे यांनी माझी लहू क्रांती संघर्ष सेना मराठवाडा अध्यक्षपदी निवड केली माझ्यावर असलेला विश्वास मी व्यर्थ जाऊ देणार नाही आणि निस्वार्थ समाजाचे काम करीन आणि संघटनेची एकनिष्ठ राहील.

### स्वातंत्र्यसेनानी वामनराव ठाकूर सभागृह नामकरण सोहळा



अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित कै देवराव बाळाजी गणगे योगेश्वरी नूतन विद्यालय प्राथमिक विभागाच्या डिजिटल सभागृहाचे नामकरण सोहळा दिनांक २६ जुलै २०२५ शनिवार रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. या सभागृहाचे उद्घाटन योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर व स्वातंत्र्यसेनानी वामनराव ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी प्रतिभाताई वामनराव ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. मराठवाड्यातील अग्रगण्य शिक्षण संस्था म्हणून परिचित असणाऱ्या योगेश्वरी शिक्षण संस्थे अंतर्गत असणाऱ्या कै. देवराव बाळाजी गणगे योगेश्वरी नूतन विद्यालयातील डिजिटल सभागृहास स्वातंत्र्यसेनानी वामनराव ठाकूर यांचे नाव देण्याचा सोहळा संस्थेचे अध्यक्ष श्री चंद्रशेखर बर्दापूरकर यांच्या अध्यक्षते खाली व कार्यकारी उपाध्यक्ष जगदीश चौसाळकर सर,सचिव कमलाकर काका चौसाळकर,संस्थेचे संचालक श्री सय्यद पाशु करीम सर, लंकेश वैद्य सर,माणिकराव लोमटे सर,रमण सोनवळकर सर, श्रीमती कल्याणी विर्धे मॅडम तसेच ठाकूर कुटुंबीयातील वामनराव ठाकूर यांच्या पत्नी श्रीमती प्रतिभाताई ठाकूर,सून अनिताताई ठाकूर, यश ठाकूर यांच्या उपस्थितीमध्ये पार पडला. प्रथम सभागृहाचे उद्घाटन श्री चंद्रशेखर बर्दापूरकर सर व श्रीमती प्रतिभा ताई ठाकूर यांच्या शुभहस्ते फित कापून करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पुष्पांजली अर्पण करून पूजन करण्यात आले व संस्था गीत वाजवून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे संचालक श्री लंकेश वैद्य सर यांनी केले प्रस्तविकामध्ये स्वातंत्र्यसेनानी वामनराव ठाकूर यांच्या कार्याचा उल्लेख करत सभागृहाला नाव देण्याचा उद्देश सांगितला. मान्यवरांच्या स्वागत समारंभा नंतर स्वातंत्र्यसेनानी वामनराव ठाकूर यांच्या प्रतिमेचे अनावरण करण्यात आले. तदनंतर श्रीनिवास वैद्य व अनंत जोशी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.ठाकूर कुटुंबीयांच्या वतीने श्री राजा ठाकूर सर यांनी संस्थेच्या ऋणात राहण्यासाठी संस्थेकडे देणगी देण्याची इच्छा व्यक्त केली. तर संस्थेने सभागृहास वडिलांचे नाव दिल्या बद्दल आभार व्यक्त केले.

# वडवणी तालुक्यात युरिया खताची कृत्रिम टंचाई

## शेतकऱ्यांची आर्थिक लूट; तालुका कृषी अधिकारी यांचे दुर्लक्ष

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यामध्ये दोन दिवस पाऊस झाल्यामुळे सोयाबीन, कापूस, मका,भुईमुंग आदी पिकांना वाढीसाठी युरिया खताची मात्र देणे आवश्यक असल्यामुळे शेतकरी युरिया खताची मागणी करत आहेत पण युरिया खताची कृत्रिम टंचाई निर्माण करून वडवणी शहरातील व तालुक्यातील कृषी सेवा केंद्र खत विक्रेते ज्यादा दराने युरिया खताची विक्री करीत आहेत याकडे मात्र वडवणी तालुका कृषी अधिकारी यांचे दुर्लक्ष.

नुकताच दोन दिवस वडवणी तालुक्यात पाऊस झाल्यामुळे युरिया खताची मागणी शेतकरी करत आहेत कृषी सेवा केंद्र खत विक्रेत्याच्या दुकानात गेल्यानंतर युरिया खताच्या एका गोणी सोबत दुसऱ्या पूरक तीन गोण्या खत घेण्याची शक्ती व एक गोणी युरिया खताची तीनशे रुपये पेक्षाही ज्यादा दराने विक्री खत विक्रेत्याकडून केली जात आहे ही खत विक्रेत्याकडून होत असलेल्या आर्थिक पिळवणुकीमुळे शेतकरी हैराण झाले आहेत खत विक्रेत्याकडे युरिया खत असताना सुद्धा त्यांनी कृत्रिम टंचाई निर्माण करुन शेतकऱ्यांची आर्थिक लूट करत आहेत याकडे मात्र वडवणी कृषी तालुका अधिकारी यांचे मात्र दुर्लक्ष आहे.




पिकांना युरिया खताची मात्रा देण्यासाठी शेतकऱ्यांची धांडल उडाली आहे खताची मात्रा वेळेत दिली तरच खत लागू होऊन पिकाची जोमाने वाढून उत्पादनात वाढ होते त्यामुळे शेतकऱ्यांची युरिया खत खरेदीसाठी झुंबड उडत आहे खतांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढल्याने या परिस्थितीचा गैरफायदा घेत खत विक्रेत्यांनी कृत्रिम टंचाई निर्माण करून युरिया खतांचा काळाबाजार चालू आहे. कृषी विभागाने खत विक्रेत्यांच्या गोदामाची पाहणी करून युरिया खताचा काळाबाजार करणाऱ्या खत विक्रेत्यावर व कृषी विभागाच्या नियमांचे पालन नकरणाऱ्या कृषी सेवा केंद्रावर कारवाई करावी त्यांचा खत विक्रेतेचा परवाना रद्द करायला हवा अशी मागणी शेतकरी करत आहेत. अन्यथा आंदोलन करू - कृत्रिम टंचाई निर्माण करून खताची काळ्या बाजारात विक्री करणे,शेतकऱ्याची आर्थिक लूट करणे खत विक्रेत्यांचे थांबवावे, युरिया खताबरोबर पूरक खते घेण्याची शक्ती करू नये,कृषी विभागाने युरिया खताचा बफर स्टॉक उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांना युरिया खत उपलब्ध करून द्यावे अन्यथा वडवणी तालुका कृषी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा- तालुक्यातील शेतकरी यांनी दिला आहे

### उद्योजक प्रकाश सुलाखे डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी स्मृती पुरस्काराने सन्मानित

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मूळचे रहिवाशी तथा पुणे येथील कॅडमॅक इंजिनिअरिंग प्रा लि चे उद्योजक तथा लेखक प्रकाश आत्माराम सुलाखे यांना डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी स्मृती पुरस्कार २०२५ या प्रतिष्ठित पुरस्कार सन्मान सोहळ्यात गेस्ट ऑफ ऑनर म्हणून गौरविण्यात आले आहे,तसेच कॅडमॅक इ इंजिनिअरिंग प्रा लि या कंपनीला प्रथम पुरस्कार टॉप ब्रँड इन इंजिनिअरिंग एज्युकेशनल लॅब इक्विपमेंट मॅन्युफॅक्चर म्हणून देण्यात आला आहे,टॉपनॉच फाउंडेशन आयोजित या कार्यक्रमाला अनेक मान्यवर व्यक्तींनी उपस्थिती लावली होती.




या सोहळ्यात प्रकाश सुलाखे यांच्यासोबत प्रसिद्ध अभिनेता आणि समाजसेवक सोनू सूद,खा तथा माजी मुख्यमंत्री नारायण राणे, तसेच विधानसभा अध्यक्ष राहुल नारवेकर,फाऊंडेशनचे सीईओ करूनसिंग व पदाधिकारी उपस्थित होते.या पुरस्कार सोहळ्यात भारतभरातील विविध प्रतिष्ठित उद्योजकांना सन्मानित करण्यात आले आहे. शिक्षण क्षेत्रातील दूरदृष्टी असलेले उद्योजक आणि लेखक प्रकाश आत्माराम सुलाखे यांच्या दुसऱ्या पुस्तकाचे या पुस्तकाचे प्रकाशन मुंबई येथील प्रसिद्ध हॉटेल ताज येथे एका भव्य आणि प्रतिष्ठित समारंभात झाले. या सोहळ्याला माजी मुख्यमंत्री खा.नारायण राणे आणि प्रसिद्ध अभिनेता व समाजसेवक सोनू सूद,विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर,फाऊंडेशनचे सीईओ करून सिंग,यांच्या उपस्थितीमुळे या क्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

### वेलतुरी येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची विनाकारण बदनामी

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील वेलतुरी येथे असणाऱ्या पशुवैद्यकीय डॉक्टर ज्ञानेश्वरी लांडगे या नियमीतपणे येऊन आपल्या कर्तव्यदक्ष काम करुन सुद्धा त्यांना राजकीय विरोधक होऊन विनाकारण बदनामी केली जाते अशी खंत आ.सुरेश धस (आण्णा)यांचे कार्यकर्ते युवा नेते दिपक वामन यांनी सांगितले**

सध्या बीड जिल्ह्यात लंपी आजाराचे लशीकरण चालु आहे तरी सुद्धा डॉ.ज्ञानेश्वरी लांडगे या महिला कर्मचारी श्रेणी तीन असुन सुद्धा वैद्यकीय दवाखान्या अंतर्गत येणाऱ्या आठ खेड्यागावात लसीकरण करत होत्या त्यामुळे काही व्यक्तींना प्रथम दर्शनी त्या जे वैद्यकीय दवाखान्यात नाहीत असे जाणुन आले व त्याचाच फायदा घेत काही विघ्न संतोषी लोकांनी राजकीय लोकांना हाताशी धरुन या महिला कर्मचारी डॉक्टर यांची बदानामी करणं हे खुप खेदाची गोष्ट आहे तसे पाहता बीड जिल्ह्यातील खुप ग्रामीण भागातील हा पशुवैद्यकीय दवाखाना असुन सुद्धा प्रत्येक शेतकऱ्यांच्या वस्तीवर जाऊन कर्मचारी पशुसेवा करत आहेत डॉ.लांडगे (मॅडम) आल्यापासून वैद्यकीय क्षेत्रातील गावात शेळी पालन व दुध व्यवसायात मोठी वाढ झाली आहे व शेतकरी समाधानी आहेत अशी माहिती सरपंच राजेंद्र म्हस्के, जावेद शेख सरपंच, आण्णा सर सिरसाठ सरपंच, बंडु म्हस्के सावरगाव, संतोष वायभासे,हानुमान गव्हाणे,नंदु गव्हाने, सोपान वामन, अशोक वामन, विकि गव्हाणे,भागवत महाराज सिरसाठ, सुधीर शिंदे, अशी माहिती वरिल शेतकऱ्यांनी दिली व त्यामुळे अशा कर्तव्यदक्ष महिला कर्मचारी बदनामी त्वरित थांबावी अशी प्रतिक्रिया आ.सुरेश धस यांचे समर्थक युवा नेते माननीय श्री दिपक वामन यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात आमच्या आमच्या प्रतिनिधी बोलताना सांगितले.

पान ६ वरून...

### प्रकाश सोळंके यांना कॅबिनेट

खुल्या प्रवर्गाला उशिरा का होईना पण न्याय मिळेल. भाविष्यात जेंव्हा शासनाकडून महामंडळाच्या नियुक्ती दिल्या जातील तेंव्हा मुस्लिम समाजासोबतच दलित,बंजारा (लमाण )धनगर, माळी यांच्यासारख्या मायक्रो- मायनॉरिटीमध्ये समाविष्ठ असणाऱ्या बारा बलुतेदारांना पुरेसे प्रतिनिधित्व देत शासकीय पदाधिकारी म्हणून काम करण्याची संधी दिली जावी अशी मागणी देखील राजेंद्र जगताप यांनी केली आहे.

### दिंद्रुडचा कोतवाल शुभम

प्रोत्साहन दिले या बळावर शुभम काटे ची राज्य राखीव पोलीस दलातील जवान म्हणून प्रशिक्षणासाठी ७ ऑक्टोबर २०२४ रोजी निवड झाली.राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र नानवीज,दौंड येथे नुकतेच प्रशिक्षण पुर्ण झाले. यापुढे राज्य राखीव पोलीस बलात सशस्त्र पोलीस शिपाई म्हणून काम करताना आता आई-वडिलांची व जनतेची सेवा करायला मिळणार याचा आनंद असल्याची शुभम काटे सांगतो.

माझा मुलगा शुभम मेहनती व प्रामाणिक आहे, त्याची पोलीस होण्याची जिद्द शेवटी पूर्ण झाली. आता तो देशात नागरिकांची सेवा करेल याचा आनंद आहे. भविष्यात मोठा अधिकारी व्हावा हेच माझे स्वप्न आहे.

-सविता मुकंद काटे,आई

शुभम काटे हा कोतवाल असताना सांगितलेले कामे प्रमाणिकपणे पूर्ण करणारा, ध्येय पूर्ण करण्यासाठी चिकाटीने अभ्यास करणारा तसेच दिंद्रुड महसूल सज्जाचा होतकरू कर्मचारी होता.त्याची एसआरपीत भरती झाल्याचा आनंद आहे.

प्रमोद चव्हाण, तलाठी दिंद्रुड सज्जा

### धानोरा रोड व अंकुश नगर

वाहन धारकांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्याचबरोबर या धानोरा रोडलगत डॉ. मदर तेरेसा चौक ते अंकुश नगर, आगलावे ईस्टेट, विठ्ठल चौक हा ३ कि.मी. चा मुख्य रस्ता आहे. १५ गेल्या वर्षापासुन केलाच नाही, त्यामुळे येथील रहिवाशीयांना मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

### मा.पंकजाताई गोपीनाथराव

श्री दगडू दळवे, रघुनाथ दादा बारगजे, श्री व्यंकट आप्पा बारगजे, गोरख अण्णा बारगजे, जीवन बारगजे, केशवजी राख, बाबासाहेब घुले, परमेश्वर घुले, नवनाथ घुले, राजाभाऊ घुले, विठ्ठल दादा घुले, नामदेव घुले, चांगदेव घुले, लक्ष्मीकांत पाळवदे, विठ्ठल बारगजे सर, अभिमान घुले, शुभम बारगजे, सुरज बालाजी घुले, सोमनाथ घुले, रामेश्वर घुले, अशोक घुले, अंगद घुले, आदित्य बारगजे व इतर मान्यवर उपस्थित होते

या वेळी गावकरी मंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते ,

सदर कार्यक्रमा यशस्वी करण्यासाठी युवा नेते सुरज रामकृष्ण घुले व विष्णू जीवन राख, श्रीराम दशरथ घुले, प्रकाश दत्तात्रय बारगजे व मित्रमंडळ यांनी परिश्रम घेतला ,

# शिवरायांच्या गौरवशाली इतिहासावर आधारित 'इतिहास महाराष्ट्राचा' उपक्रम

### बीडमध्ये १२ ऑगस्टला प्राथमिक फेरी; अंतिम फेरी मुंबईत २३ व २४ ऑगस्टला

**बीड । प्रतिनिधी**

**छत्रपती शिवाजी महाराजांचा तेजस्वी इतिहास लहान मुलांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने बालरंगभूमी परिषदेने 'इतिहास महाराष्ट्राचा' हा विशेष उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाअंतर्गत शिवजन्मोत्सव ते शिवराज्याभिषेक या कालखंडातील महत्त्वाच्या घटनांचे सादरीकरण नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला आणि इतर कला प्रकारांद्वारे करण्यात येणार आहे. या उपक्रमाची प्राथमिक फेरी बीडमध्ये दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी होणार असून अंतिम फेरी २३ व २४ ऑगस्ट २०२५ रोजी मुंबईत पार पडणार आहे. ही माहिती बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्षा नीलम शिर्के-सामंत, बीड जिल्हाध्यक्षा डॉ. दीपा क्षीरसागर आणि प्रमुख कार्यवाह योगेश शुक्ल यांनी दिली.**

या स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्रातील सर्व शाखा स्तरावर करण्यात आले आहे. स्पर्धा एकल आणि समूह अशा दोन गटांमध्ये होणार आहे. एकल गटामध्ये वयोगट १ व २ मधून प्रत्येकी प्रथम व द्वितीय क्रमांकाचे स्पर्धक, तसेच समूह गटातून दोन संघ अंतिम फेरीसाठी निवडले जाणार आहेत. एकल गट १: स्पर्धकांनी स्वतः छत्रपती शिवाजी महाराज किंवा त्याकाळातील अन्य व्यक्तिमत्त्वांचे सादरीकरण ५ मिनिटांत करावे. एकल गट २ व समूह गट: शिवजन्मोत्सव ते राज्याभिषेक दरम्यानच्या घटनांचे १० मिनिटांपर्यंत सादरीकरण अपेक्षित असून, यामध्ये ४ ते ८ बालकलावंतांचा सहभाग असावा. विविध कला प्रकारांचा समन्वय असावा. प्रत्येक सादरीकरणासाठी




वाद्यवृंद, नेपथ्य, रंगभूषा आणि वेशभूषेची जबाबदारी संबंधित स्पर्धकांची असेल. आयोजकांकडून फक्त ध्वनी व प्रकाशयोजनेची सुविधा दिली जाईल. स्पर्धेचे निकाल अंतिम व बंधनकारक असतील. प्राथमिक व अंतिम फेरीतील सर्व सहभागी आणि विजेत्यांना प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी नाव नोंदणीची अंतिम तारीख ८ ऑगस्ट असून, अधिकाधिक शालेय विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन बालरंगभूमी परिषदेचे बीड जिल्हा पदाधिकारी डॉ. संजय पाटील देवळाणकर, स्नेहल पाठक, विलास सोनवणे, अनुराधा चिंचोलकर, मिलिंद शिवनीकर, दीपक जमदाडे, दुष्यंता रामटेके, नामदेव साळुंखे, सुरेश साळुंखे, विजय राख, राहुल सोनवणे, असलम शेख, अमित गाढे, बालासाहेब कांबळे, रोहित पुराणिक, दीपक गिरी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी विजय राख: ९८३३३४५८०९, अमित गाढे: ८८८८९६६७९२, दीपक गिरी: ८१७७९२४७५६, रोहित पुराणिक: ९३२५२१२१९९, सिद्धार्थ अग्रवाल: ९७६५०८५३३१, सुमित गायकवाड: ७०२८०२७८५२ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.


### टीसी हरवला आहे

अश्वमेध विठ्ठल भालेकर या विद्यार्थ्यांचा बारावी पास चा टी.सी. फुलसांगवी -बीड एसटी प्रवासादरम्यान हरवला आहे. सापडल्यास संपर्क करा.

**संपर्क**

**अश्वमेध विठ्ठल भालेकर**

**मो. ९३०९०८३०४५**

### टीसी हरवला आहे

कृष्णा विजय खांडेकर रा. कोल्हेवाडी ता. केज जि.बीड या नावाचा बारावी पासचा टिसी लातूर ते केज प्रवासादरम्यान हरवला आहे. सपडल्यास संपर्क साधावा.

**संपर्क**

**८२३७१६०६१६**

### टीसी हरवला आहे

पाटोळे प्रविण भीमराव या नावाचा १२ वी पासचा टी सी म्हाळसजवळा ते बीड प्रवासादरम्यान हरवला आहे.सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा.

**संपर्क**

**९५२७८२९३२७**


### जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ११८५/२०२५**

**ॲड. सोंडगे एस. एम.**

अर्जदार : १) अजय पि. दादासाहेब काशीद, वय-२३ वर्षे, धंदा-शेती, रा. साक्षाळपिंप्री, ता. जि. बीड. २) विजय पि. दादासाहेब काशीद, वय-१९ वर्षे, धंदा-शेती, रा. साक्षाळपिंप्री, ता. जि. बीड.

विरुध्द गैरअर्जदार निरंक

अर्जदार हे भारतीय आहेत प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यानी मयत नामे संगीता दादासाहेब काशिद यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे . मयत नामे संगीता दादासाहेब काशिद, रा. साक्षाळपिंप्री, ता. जि. बीड हे दिनांक १५/०७/२०२४ रोजी साक्षाळपिंप्री, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे मुले आहेत मयत संगीता यांचे पती नामे दादासाहेब हे दि. १०/०७/२०१७ रोजी मयत झालेले आहेत अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत अर्जदाराचे असेही म्हणणं आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सरदचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणाम समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावीण पुढील दिनांक ३०/०८/२०२५ आज दिनांक २८/०७/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**आदेशावरून**

**स्वाक्षरित**

**अधिक्षक**

**दिवाणी न्यायालय व. स्तर बीड**

**स्वाक्षरित**

**क लिपीक**

शिक्का

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

दुरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६

E-Mail ID:-tahsildarambad@gmail.com

जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-७२ दिनांक-०३/०७/२०२५

### जाहीर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती संदीप रामकिसन भचांडे रा.नागझरी ता. अंबड जि. जालना यांचे यांचे वडील च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
| --- | --- | --- |
| रामकिसन राणूजी भचांडे | वडील | १९/१०/२००१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**

**तहसिलदार तथा**

**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

दुरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६

E-Mail ID:-tahsildarambad@gmail.com

जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-९८ दिनांक-२३/०७/२०२५

### जाहीर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती ज्ञानेश्वर महादेव चिलगर रा.कुरण ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- |
| सोनाली ज्ञानेश्वर चिलगर | मुलगी | १५/०५/२०१० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक २३/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**

**तहसिलदार तथा**

**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

दुरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६

E-Mail ID:-tahsildarambad@gmail.com

जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१७४ दिनांक-२८/०७/२०२५

### जाहीर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती त्रिंबक आसाराम कातकर रा.पाथरवाला बु. ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या आई-वडील च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
| --- | --- | --- |
| द्वारकाबाई आसाराम कातकर | आई | ०१/०७/२०८० |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक २८/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**

**तहसिलदार तथा**

**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
मंगळवार दि. २९ जुलै २०२५
४

# राज्यभरात सर्वदूर पावसाची हजेरी

## कोयनेसह उजनी, वीर धरणातून विसर्ग वाढवला, चंद्रभागेसह गोदाकाठही खळाळला,

राज्यभरात गेल्या दोन दिवसांपासून सर्व दूर पावसाची हजेरी लागली आहे .अनेक भागात सकाळपासून मुसळधार पावसाची नोंद होतेय . काही ठिकाणी पावसाची संततधार सुरू असून ने आजही राज्यात विविध ठिकाणी अलर्ट दिले आहेत . गेल्या दोन दिवसांपासून धरण क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे अनेक धरणांमध्ये पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे .साताऱ्यात कोयना, धोम, कन्हेर धरणातून पाण्याचा विसर्ग वाढल्याने कृष्णा नदीच्या पाणी पातळीत वाढ झालीये .नांदेडच्या विष्णुपुरी धरणाचे चार दरवाजे उघडले असून गोदापात्रात मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरू आहे . विठुरायाच्या पंढरपुरावर पुन्हा एकदा पुराची टांगती तलवार असून चंद्रभागेच्या पात्रात ५० हजार क्युसेकपेक्षा अधिक विसर्गने पाणी येणार असल्याचं सांगितलं जातंय . कुठे काय परिस्थिती कोणत्या धरणांमधून विसर्ग सुरू आहेत ? पाहूया सविस्तर .

उजनीतून विसर्ग वाढवला, चंद्रभागेच्या पाणीपातळीत वाढ

उजनी धरणातून सोडण्यात येणाऱ्या पाण्याचा विसर्ग मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आला असून आता ४१,६०० क्युसेक वेगाने भीमा नदीत पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे .यामुळे नदीकाठच्या सर्व लोकांना सावधान त्याचा इशारा देण्यात आलाय .पाण्याचा प्रवाह अधिक असल्याने पात्राच्या जवळ न जाण्याचा सल्ला देण्यात आलाय .वीर धरणातून सोडण्यात येणारा विसर्गही १० हजारांपर्यंत नेण्यात आला असून या दोन्ही धरणातील विसर्गामुळे चंद्रभागेच्या पाणी पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ होण्यास सुरुवात झाली आहे .चंद्रभागेच्या पात्रात ५० हजार क्युसेक पेक्षा अधिक विसर्ग येणार असून पुन्हा एकदा पंढरपुरावर पुराची टांगती तलवार आहे .पुणे आणि साताऱ्यातील पाऊस न थांबल्यास पाण्याचा विसर्ग अजून वाढण्याची शक्यता आहे .



कोयना, धोम अन्? कन्हेर धरणातून विसर्ग वाढला

सातारा जिल्ह्यातील कोयना, धोम आणि कण्हेर धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवल्याने, कोयना नदी, संगम माहूली येथील वेण्णा आणि कृष्णा नदीच्या पाणी पातळीत वाढ नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलाय. सातारा जिल्ह्यात घाटमाथ्यावर सध्या मुसळधार पाऊस पडत असल्यामुळे जिल्ह्यातील सर्व धरणांच्या पाणी पातळीत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी असलेलं कोयना धरणाचे पाच फुटाणे दरवाजे उचलल्याने २०, हजार ९०० पाण्याचा पाण्याचा विसर्ग कोयना नदीपात्रात सुरू करण्यात आला आहे.धोम धरणातून ७००० क्युसेक इतका विसर्ग कृष्णा नदी पात्रात होत असून कण्हेर धरणातून ४,१०० पाण्याचा विसर्ग वेण्णा नदीपात्रात केला जात आहे.. यामुळे कोयना, वेण्णा आणि कृष्णा नदीच्या पाणी पातळी वाढली आहे.

विष्णुपुरी धरणाचे ४ दरवाजे उघडले : संततधार पावसामुळे नांदेड शहरातील विष्णुपुरी धरण ८९ टक्के भरलं आहे. पाण्याची आवक सुरूच असल्याने धरणाचे चार दरवाजे उघडण्यात आले. त्यातून ५९ हजार क्युसेस इतक्या वेगाने पाण्याचा विसर्ग गोदावरी नदीत केला जात आहे .. मोठया प्रमाणात पाण्याचा विसर्ग सूरू असल्याने गोदावरी नदी दूथडी भरून वाहत आहे .. त्यामूळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे ..त्यामूळे आपत्ती व्यवस्थापन , एसडीआरएफच्यां पथकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आले आहेत .. अजूनही गोदावरी नदीत पाण्याची आवक सुरूच आहे .. त्यामूळे विसर्ग वाढण्याची शक्यता आहे ... विशेष म्हणजे गेल्या चार दिवसापूर्वी विष्णुपुरी धरणात २४ टक्के इतका पाणी साठा शिल्लक होता .. मात्र दोन दिवसाच्या पावसाने धरणाचे चार दरवाजे उघडून पाण्याचा विसर्ग करण्याची परिस्थीती निर्माण झाली .. गोदावरी नदीत पाण्याची आवक वाढल्याने रात्री दोन आणि आज सकाळी दोन दरवाजे उघडले. या पावसाळयात पहिल्यांदाच धरणाचे दरवाजे उघडण्यात आले आहेत.

परभणीच्या गंगाखेडमधील गोदाघाटासह मंदिरेही पाण्याखाली

काल परभणी जिल्ह्यात सर्वत्र जोरदार पाऊस बरसला यामुळे गोदावरी वरील चारही बंधारे तुडुंब भरले आहेत या चारही बंधाऱ्यांमधून गोदावरी नदी पात्रामध्ये पाण्याचा विसर्ग सोडण्यात आल्यामुळे गोदावरी नदीला मोठ्या प्रमाणावर पाणी आले असून गोदावरी तुडुंब भरून वाहत आहे गंगाखेड मधील गोदा घाट पूर्णतः पाण्याखाली गेला असून मंदिरही पाण्याखाली गेली आहेत त्यामुळे गोदावरी नदी काठच्या सर्व गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

निळवंडे धरणातून नदीपात्रात सांडव्याद्वारे विसर्ग : निळवंडे धरणातील विसर्ग वाढवून ८५०० क्युसेक करण्यात आला असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलाय. नदीपात्रातील चल मालमत्ता, चीज वस्तू, वाहने, पशुधन, शेती अवजारे आणि इतर मनुष्य उपयोगी संसाधने सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्याच प्रशासनानं आवाहन केलंय.भंडारदरा आणि निळवंडे धरण पाणलोटात पावसाचा जोर कायम आहे.धरणातील पाणीसाठा नियंत्रित करण्यासाठी भंडारदरा आणि नळवंडे धरणातून पाण्याचा विसर्ग सुरुय.

गोसेखुर्द धरणाचा विसर्ग आणखी १४ हजार क्यूसेकने वाढविला

भंडाऱ्यातील गोसेखुर्द धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्यानं धरण प्रशासनानं धरणातून करण्यात येणाऱ्या पाण्याच्या विसर्गात तीन तासांतचं आणखी मोठी वाढ केली आहे. सकाळी १९ दरवाजे एक मीटरनं तर, १४ दरवाजे अर्धा मीटरनं उघडण्यात आली होती. त्यात तीन तासातचं आणखी मोठी वाढ केली आहे. २ लक्ष ११ हजार ८५३ क्युसेक वेगानं पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. सकाळीच्या तुलनेत १४ हजार ४०८ क्युसेक पाण्याचा विसर्ग वाढविण्यात आला आहे.

# ऊस गवताळ वाढ नियंत्रण कशी करावी?

गवताळ वाढ हा फायटोप्लाझ्मा या अति सूक्ष्म जिवाणूंमुळे होणारा रोग आहे. या रोगाचे जास्त प्रमाण हे मुख्यतः लागणीपेक्षा खोडवा पिकावर मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. महाराष्ट्रातील प्रचलित जातींमध्ये को ४१९, को ७४०, को ७५२७ आणि को.सी. ६७१ या जाती या रोगास कमी ते मध्यम प्रमाणात बळी पडलेल्या दिसून येतात. परंतु हा गवताळ वाढ रोग अलीकडील प्रसारित जातींच्या खोडव्यामध्येही काही अंशी दिसू लागला आहे. गवताळ वाढ हा रोग उसामधील वाढीच्या वेगवेगळ्या अवस्थेमध्ये महत्त्वाची लक्षणे दर्शविते.

रोगग्रस्त उसाची प्राथमिक लक्षणे लावणीनंतर अथवा खोडव्यातील उगवून आलेल्या उसाच्या पानावर दिसून येतात. फायटोप्लाझ्मामुळे लागण झालेल्या उसाच्या पानांमध्ये हरितद्रव्ये नसल्यामुळे पाने पांढरी अथवा पिवळसर पडलेली दिसून येतात, याला अल्बिनो रोग म्हणतात. अशा उसाच्या बेटांमधून असंख्य फुटवे घेऊन अशी बेटे खुरटी राहतात. हे फुटवे निव्वळ पांढरट अथवा पिवळसर दिसून त्याची पाने अरुंद, लहान, टोकाकडे निमुळती होत गेलेली दिसून येतात व त्यास गवताच्या ठोंबांचे स्वरूप येते. काही वेळेस नुसतेच रंगाचे असंख्य फुटवे असलेले दिसून येतात. अशा गवताळ बेटांमध्ये नव्याने येणारे फुटवे फार दिवस टिकत नाहीत, गाळपालायक ऊस तयार होत नाहीत. प्रादुर्भावग्रस्त उसाच्या बेटामधील पाने ही टोकाकडून जळत जाऊन उसाचे बेट पूर्णतः मरून जाते. प्रादुर्भावग्रस्त बेटांमध्ये क्वचित ठिकाणी करंगळीएवढे अथवा त्यापेक्षा लहान ऊस तयार होतात. अशा उसावरील कांड्या आकाराने खूपच बारीक तयार होऊन कांड्यांवरील डोळे वेळेअगोदर फुटून त्यामधून पिवळी पाने बाहेर येतात आणि जमिनीलगतच्या कांड्यांवर मुळ्या आलेल्या दिसून येतात.



आर्थिक नुकसान : प्रादुर्भावग्रस्त ऊस बेटा मध्ये गाळप लायक ऊस तयार होत नसल्यामुळे ऊस उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात घट येते. या रोगामध्ये नवीन तयार होणारे फुटवे मरून गेलेले दिसतात. काही ठिकाणी एखादा दुसरा ऊस असल्यास त्याच्या कांड्या करंगळीएवढ्या वा त्याहून बारीक दिसतात. या उसाची जाडी व उंची कमी असते.

गवताळ वाढ रोगावर उपाययोजना : रोगमुक्त बेणे मळयातील ऊस लागवडीसाठी वापरावा, दर तीन वर्षांतून बेणे बदलून प्रमाणित बेणे वापरावे. लागवडीनंतर किंवा खोडव्यामध्ये गवताळ वाढीची बेटे आढळून आल्यास ती मुळासकट काढून जाळून नष्ट करावीत. लागवडीपूर्वी बियाण्यास उष्ण जल अथवा उष्ण बाष्पाची प्रक्रिया करावी किंवा अशी प्रक्रिया केलेल्या बेणेमळयातील बेणे लागवडीसाठी वापरावे. ऊस पिकावर आढळणाऱ्या रसशोषण करणाऱ्या मावा किडी मार्फत या रोगाचा प्रादुर्भाव व प्रसार होऊ शकतो, त्यामुळे वेळोवेळी नियमितपणे पिकांचे सर्वेक्षण करून आढळून येणाऱ्या किडीवर आंतरप्रवाही कीटकनाशकांची (दीड मि.लि. डायमिथोएट प्रति लिटर) फवारणी करावी.रोगप्रतिकारक अथवा रोगास कमी बळी पडणाऱ्या जाती को ८६०३३ आणि फुले ०२६५ या जातींची लागवड करावी. लागवडीखालील उसामध्ये गवताळ वाढ जास्त प्रमाणात असल्यास अशा उसाचा खोडवा घेऊ नये अथवा त्यामधील ऊस बियाणे म्हणून वापरू नये. अशी बेटे उपटून त्याठिकाणी निरोगी ऊस बेण्याची लागण करावी.

# मिरची पिकातील पांढरी माशी नियंत्रण

सध्या सर्वच भागात मिरची पिकांमध्ये पांढरी माशीचा खुप मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव दिसून येत आहे. वातावरणातील सतत होणारे बदल, आर्द्रता, उष्णता याचा परिणाम म्हणून रसशोषक किडींचा वाढता प्रादुर्भाव दिसून येतो आहे. मिरची पिकांबरोबरच ईतरही पिकांमध्ये पांढरी माशीचा खुप मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. याचे कारण म्हणजे बदलत्या वातावरणाबरोबर दिवसेंदिवस कमी होत चाललेली जमिनिची सुपिकता आणि यामुळेच कमी होत असलेली पिकांची ही रोगप्रतिकारक क्षमता त्यामुळे सर्व प्रकारच्या रसशोषक किडींचा सर्व पिकांवर वाढता प्रादुर्भाव दिसून येत आहे.

ओळख व लक्षणे : १. पांढरी माशी ही कीड टोमॅटो, मिरची, वांगी, कोबी व फळ पिकांवर आढळते. २. या किडींचा आकार ०.५ मिमी पेक्षा कमी असतो. रंग भुरकट पांढरा व डोळ्याचा रंग लाल असतो. ३. या किडींच्या पंखावर पांढरी भुकटी असते. कोश व किडींचा आकार फुगीर, गोलाकार असतो. ४. पिल्ले व प्रौढ शरीरावर केस असतात. ५. ही कीड पिल्ले व प्रौढ या दोन्ही अवस्थेत पानांतील रस शोषण करते. ६. त्यामुळे पानांचा रंग पिवळसर होतो. या किडीच्या जास्त उद्रेकामुळे फुलगळ होते व फल धारणा होत नाही आणि पांढऱ्या माशीचे नियंत्रणकरणे खूप जास्त आवश्यक बनते.

जीवनक्रम : १. ३० दिवसांचा (अंडी, पिले, कोष आणि प्रौढ) पांढरी माशी किडीची मादी पानांच्या खालच्या बाजूला १५० ते २०० पर्यंत अंडी घालते. २. १० दिवसात अंडी उबवून त्यातून पिल्ले बाहेर पडतात. ही पिल्ले योग्य वास्तव्य शोधण्यासाठी झाडावर भटकतात. ३. वास्तव निश्चित झाल्यावर वनस्पतीच्या पेशी जलात आपली सोंड खुपसून त्यातील रस शोषण करतात. ४. या किडीची पूर्ण वाढ ७० ते ७५ दिवसात होते. वाढ झालेली कीड कोषावस्थेत जाते. ५. ही अवस्था १६० दिवस असते. त्यातुन नंतर पांढरी माशी बाहेर पडते.

प्रादुर्भावाची लक्षणे : १. पानांच्या कडा खालील बाजूस वळतात. तसेच पाने पिवळी पडतात. २. पिले आणि प्रौढ पानातील रस शोषून घेतात. ३. तसेच पांढऱ्या माशीच्या शरीरातून बाहेर पडणाऱ्या पारदर्शक चिकट द्रवावर काळ्या बुरशीची वाढ होते. ४. ही कीड पर्णगुच्छ (लीफ कर्ल) या विषाणूजन्य रोगाचा प्रसार करते. एकात्मिक किड नियंत्रण : १. जैविक नियंत्रण – बिव्हेरिया बॅसियाना + व्हर्टिसिलियम लेकॅनी किंवा मेटारायझिम ऍनिसोपली या जैविक उत्पादनाची ४ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे घेऊन फवारणी करावी. २. सेंद्रिय नियंत्रण – निम (१०००० ) किंवा गार्डप्लस किंवा निमकरंज अधिक फ़िश ऑईल या सेंद्रिय कीटकनाशकांची १.५ मिली प्रति लीटर पाणी यांप्रमाणे दर ७ ते १० दिवसाच्या कालावधीत फवारणी घ्यावी. ३. रासायनिक नियंत्रण – अ) रोपवाटिकेत रोपे उगवल्यानंतर अडमायर, बायर, इमिडाक्लोप्रिड ०.५ मिली अधिक धानुस्टीन, धानुका, कार्बेन्डाझिम १ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणीसाठी वापर करावा. ब) पुर्नलागवड वेळी रोपांची मुळे खालील औषधाच्या द्रावणात बुडवावीत. रेजेंट, बायर, फिप्रोनिल (५%) १.५ मिली किंवा ॲक्टरा, सिजेंटा, थायामेथोक्झाम (२५%) ०.४ ग्रॅम प्रति लिटर पाणी यांप्रमाणे घ्यावे. क) लागवडीनंतर अरेवा,धानुका, थायमेथोक्झाम (२५%) ०.४ ग्रॅम १ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणी घ्यावे. ड) लागवडीनंतर फळे येण्यापूर्वी पेगासस, सिजेंटा, डायफेन्थुरान ( ५० पी.डब्ल्यू.पी. ) १ ग्रॅम किंवा वेटसिट, धानुका, फेनप्रोपॅथ्रीन ( ३० ईसी) १ मिली. प्रति लिटर पाणी याप्रमाणे फवारणीसाठी घ्यावे.



# सोयाबीन पिकावरील रोगाचे व्यवस्थापन

सद्या ढगाळ वातावरणामुळे जमिनीतून अन्नद्रव्य घेता न आल्याने सोयाबीनची रोपे पिवळे-पांढरे पडत आहे. लोह या सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे सोयाबीनच्या झाडामध्ये क्लोरोसिसची लक्षणे निर्माण होतात. क्लोरासीस ही जमिनीत लोहाच्या कमतरतेमुळे होत नाही. तर काही कारणाने झाडांद्वारा लोह शोषण न केल्याने होते.

कशी ओळखावी लक्षणे : लोह या सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता सर्वप्रथम कोवळ्या पानांवर दिसून येते. हरितद्रव्याच्या अभावामुळे पानांच्या शिरांमधील भाग पिवळा पडतो व शिरा फक्त हिरव्या दिसतात. सोयाबीनचे प्रथम ट्रायफोलिएट पाने हिरवी राहतात कारण लोह हे अन्न द्रव्य वाहू न शकणारे आहे. लोह रोपट्यात स्थिर होऊन साठविले जाते. त्यामुळे, नवीन पानांमध्ये लक्षणे दर्शविली जातात. पाने पिवळी पडल्याने हरितद्रव्य कमी होऊन प्रकाश संश्लेषण क्रिया मंदावते व वाढ खुंटते आणि उत्पादनही कमी येते.

काय आहेत कारणे : लोहाची कमतरता विशेष म्हणजे कमी प्रमाणात निचरा होणाऱ्या चुनखडी युक्त जमिनीत होते. वनस्पतींमध्ये हिरवे रंगद्रव्य- क्लोरोफिल तयार करण्यासाठी लोह (फेरस) आवश्यक असते. बहुतेक जमिनीमध्ये वनस्पतींच्या आवश्यकतेपेक्षा जास्त प्रमाणात लोह हे सूक्ष्म अन्न द्रव्य असते. जमिनीचा सामू (पीएच) ७.५ पेक्षा जास्त असतो त्या जमिनीतील लोह या उपलब्ध स्थितीत न राहता फेरीक स्वरूपात जातो व तो पिकांना शोषून घेता येत नाही त्यामुळे पिकावर लोहाची कमतरता दिसते. तसेच जमिनीत मुळांना ऑक्सिजन पुरवठा कमी झाल्याने देखील मुळाद्वारे लोह कमी शोषला जाऊन क्लोरासीस होतो.

असे करा व्यवस्थापन : शेतात वाफसा स्थिती निर्माण होण्यासाठी अतिरिक्त पाणी साचलेले असेल ते काढण्याची सोय करावी. वाफसा आल्यानंतर पीक ३०-३५ दिवसांचे होण्यापूर्वी एक कोळपणी करावीच. ईडीटीए चिलेटेड मिक्स मायक्रोन्यूट्रिएंट ग्रेड-२ ५० ग्रॅम किंवा ५० मिली, खत १०० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता वाटल्यास ८-१० दिवसांनी पुन्हा एकदा फवारणी करावी. पाण्याचा ताण पडल्यास ठिबक च्या साह्याने संरक्षित पाणी द्यावे.

सिंचन सुविधा उपलब्ध नसल्यास (पोटॅशियम नायट्रेट) या विद्राव्य खताच्या १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आवश्यकतेनुसार ८ दिवसाच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात.



## दिन विशेष

### जागतिक दिवस
### जागतिक व्याघ्र दिन
### विषमता विरोधी दिन

### महत्वाच्या घटना

१८५२ : पुणे महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर कँडी यांच्या हस्ते विश्रामबागवाड्यात स्त्रीशिक्षणाचे भारतीय उद्गाते म्हणून जोतीबा फुले यांचा सन्मान करण्यात आला.
१८७६ : फादर आयगेन ला फॉन्ट आणि डॉ. महेन्द्र सरकार यांनी 'इंडियन असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स' या संस्थेची स्थापना केली.
१९२० : जगातील पहिली हवाई टपाल सेवा अमेरिकेतील न्यूयॉर्क ते सानफ्रान्सिस्को या शहरांमधे सुरू झाली.
१९२१ : ॲडॉल्फ हिटलर नॅशनल सोशलिस्ट जर्मन वर्कर्स पार्टीचे नेते बनले.
१९४६ : टाटा एअरलाइन्सचे 'एअर इंडिया' असे नामकरण करण्यात आले.
१९४८ : दुसऱ्या महायुद्धामुळे पडलेल्या १२ वर्षांच्या खंडानंतर लंडन येथे १४ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९५७ : 'इंटरनॅशनल ॲटॉमिक एनर्जी एजन्सी 'ची स्थापना झाली.
१९८५ : मल्याळम लेखक टी. एस. पिळ्ळे यांना ज्ञानपीठ पुरस्कार
१९८७ : भारताचे पंतप्रधान राजीव गांधी व श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष जे. आर. जयवर्धने यांनी भारत-श्रीलंका शांतता करारावर सह्या केल्या.
१९९७ : कलकत्त्याच्या वंगीय साहित्य परिषदेतर्फे देण्यात येणार्या साहित्यिक हरनाम घोष स्मृतीचिन्हासाठी दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांची निवड. अखिल भारतीय स्तरावरील हा पुरस्कार मराठी साहित्यिकास प्रथमच मिळाला.
२०२१ : आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानक रशियन मॉड्यूल नौकाच्या इंजिनातील बिघाडानंतर तात्पुरते नियंत्रणाबाहेर गेले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८३ : बेनिटो मुसोलिनी इटलीचा हुकूमशहा (मृत्यू: २८ एप्रिल १९४५)
१८९८ : नोबेल पारितोषिक विजेते भौतिकशास्त्रज्ञ इसिदोरआयझॅक राबी यांचा जन्म.
१९०४ : जहांगीर रतनजी दादाभॉय तथा 'जे. आर. डी. टाटा' भारतरत्न, उद्योगपती व वैमानिक, भारतीय नागरी विमान वाहतुकीचे जनक (मृत्यू: २९ नोव्हेंबर १९९३)
१९२२ : ब. मो. पुरंदरे इतिहासकार आणि लेखक, शिवशाहीर
१९२५ : शि. द. फडणीस व्यंगचित्रकार
१९३७ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ डॅनियेल मॅकफॅडेन यांचा जन्म.
१९५३ : अनुप जलोटा भजनगायक
१९५९ : संजय दत्त अभिनेता व गुन्हेगार
१९८१ : फर्नांडो अलोन्सो स्पॅनिश रेस कार ड्रायव्हर

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

२३८ : बाल्बिनस रोमन सम्राट (जन्म: १६५)
११०८ : फिलिप (पहिला) फ्रान्सचा राजा (जन्म: २३ मे १०५२)
१७८१ : योहान कीज जर्मन गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ (जन्म: १४ सप्टेंबर १७१३)
१८५६ : मधे विधवा विवाहाचा कायदा आला. (जन्म: २६ सप्टेंबर १८२०)
१८९० : व्हिन्सेंट व्हॅन गॉग डच चित्रकार (जन्म: ३० मार्च १८५३)
१८९१ : इश्वरचन्द्र विद्यासागर बंगाली समाजसुधारक, तत्त्वज्ञ, लेखक, शिक्षणतज्ञ व उद्योजक. यांच्या प्रयत्नांमुळेच
१९०० : इटलीचा राजा उंबेर्तो पहिला यांचे निधन.
१९८७ : भारतीय लेखक, कवी आणि नाटककार बिभूतीभूशन मुखोपाध्याय यांचे निधन. (जन्म: २४ ऑक्टोबर १८९४)
१९९४ : नोबेल पारितोषिक विजेती ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ डोरोथीक्रोफूट हॉजकिन यांचे निधन.
१९९६ : अरुणा असफ अली स्वातंत्र्यसेनानी. ९ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांनी मुंबईतील गोवालिया टँक मैदानावर तिरंगा फडकवला होता. लेनिन शांतता पुरस्कार, इंदिरा गांधी शांतता पुरस्कार, पद्मविभूषण, आंतरराष्ट्रीय सद्भावना पुरस्कार, भारतरत्न (मरणोत्तर) इ. पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. (जन्म: १६ जुलै १९०९)
२००२ : सुधीर फडके ऊर्फ 'बाबूजी' गायक व संगीतकार (२५ जुलै १९१९)
२००३ : बद्रुद्दीन जमालुद्दीन काझी उर्फ 'जॉनी वॉकर' विनोदी अभिनेता (जन्म: ११ नोव्हेंबर १९२६)
२००६ : डॉ. निर्मलकुमार फडकुले मराठी संत साहित्यातील विद्वान (जन्म: १६ नोव्हेंबर १९२८)
२००९ : महाराणी गायत्रीदेवी जयपूरच्या राजमाता (जन्म: २३ मे १९१९)
२०१३ : भारतीय क्रिकेटरपटू मुनीर हुसेन यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १९२९)

cmyk



# जलदगती चाचणी झाली पण इलेक्ट्रीक जोडणी अभावी बीडला रेल्वे धावेना

## सदोष रेल्वेपुल प्रकरणात कारवाईसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन

बीड। प्रतिनिधी

बहुचर्चित, बहुप्रतिक्षित आणि जिल्ह्याच्या विकासात मैलाचा दगड ठरणारा अहिल्यानगर - बीड- परळी लोहमार्ग पुर्णत्वाकडे जात असुन रेल्वे रूळ अंथरणे, रेल्वे स्टेशन उभारणीचे कामही मार्गी लागले असले तरी या मार्गावर इलेक्ट्रिक जोडणीचे काम रखडलेले असल्याने जलदगती चाचणी होऊनही बीडला रेल्वे कधी धावणार? असा प्रश्न बीडकरांना पडला आहे. रखडलेले काम तातडीने पूर्ण करावे या मागणीसह च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथील पावणे ३ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेला पुल पाडण्याचे काम सुरू आहे हा जनतेच्या पैशांचा अपव्यय असुन संबंधित अभियंता आणि कंत्राटदार यांच्याकडून नुकसानभरपाई वसूल करण्यात यावी व तसेच बहुतांश रेल्वे पुलाखाली पावसाळ्यात पाणी साचत असल्याने ग्रामस्थांना वाहतुकीची अडचण येते त्यामुळे पाण्याचा निचरा करण्याची उपाययोजना करावी या प्रमुख मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ





महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२८ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करून जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, सुदाम तांदळे , पांडुरंग हराळे,अशोक येडे जिल्हाध्यक्ष (आप), रामधन जमाले जिल्हाध्यक्ष( इंटक), जरांगे पाटील, किष्किंधा पांचाळ , शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील आदी सहभागी होते.जलदगती चाचणी झाली परंतु इलेक्ट्रीक जोडणी अभावी बीडला रेल्वे धावेना बीड रेल्वेसाठी गेल्या ४० वर्षांपासून स्वातंत्र्य सैनिक ,रेल्वे मागणी आंदोलन समिती, रेल्वे कृती संघर्ष समिती, अनेक नागरीक युवा कार्यकर्ते यांनी रस्त्यावर उतरून संघर्ष केला आहे.

वेळप्रसंगी आंदोलकांना जेलमध्येही जावे लागले आहे. अहिल्यानगर - बीड - परळी या २६१ किलोमीटर रेल्वे मार्गावरील ८० टक्के रेल्वे रूळ अंथरण्याचे आणि रेल्वे स्टेशन उभारणीचे काम कामही मार्गी लागले आहे. ४ फेब्रुवारी २०२५ रोजी बीड स्थानकापर्यंत रेल्वेची जलदगती चाचणी घेण्यात आली. या मार्गावरील इलेक्ट्रीक जोडणी काम अद्याप पूर्ण मार्गावर झालेले नाही हे काम पूर्ण झाल्यानंतरच नियमित रेल्वे सुरू होऊ शकते.सध्या विघनवाडी पर्यंत काम पूर्ण झालेले आहे. ईलेक्ट्रीक जोडणी अभावी बीडला रेल्वे धावण्याचे काम रखडले असुन या कामाला गती देऊन तातडीने पूर्ण करण्यात यावे. दिशा चुकली म्हणून पावणे तीन कोटींचा पुल पाडला; पुल पाडण्यासाठी २० लाखाचा खर्च आणि नविन पुलासाठी १५ कोटी संबंधित अभियंता व कंत्राटदार यांच्यावर प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करावी

बीड तालुक्यातील च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथील २ कोटी ७० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेला पुल लोहमार्गाची व पुलाची दिशा यांचा अंदाज चुकल्याने निरुपयोगी ठरला असुन रेल्वे पुल पाडण्याचे काम सुरू आहे. आता पुल पाडण्यासाठी २० लाख रुपये खर्च असुन नविन पुल बांधण्यासाठी १५ कोटी रुपये खर्च येणार आहे. जनतेच्या पैशाचा अपव्यय असुन संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून संबंधित रेल्वे विभागाचे अभियंता आणि लोहमार्ग पुलाचे काम करणारी ठेकेदार कंपनी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करून नुकसान भरपाईची रक्कम शासन तिजोरीत जमा करण्यात यावी.

बीड जिल्ह्यातील अहिल्यानगर -बीड- परळी या रेल्वे मार्गावरील रेल्वे पुलांची पाहणी करुन पुलाखालचे पाणी काढुन देण्याची व्यवस्था न केल्याने पाणी साचत असुन बीड तालुक्यातील पालवण चौक,नवगण राजुरी, जरूड, बाभुळखुंटा येथील रेल्वे पुलाखाली पाणी साचल्याने ग्रामस्थांची वाहतुकीची अडचण होत असुन संबंधित प्रकरणी आवश्यक उपाययोजना करण्यात यावी.

# कॅन्सरचे वेळीच निदान होणे गरजेचे- डॉ.शैलेश अग्रवाल

## कॅन्सर रोग निदान शिबिरात १०८ रुग्णांची तपासणी




परळी । प्रतिनिधी

कॅन्सर रोगामुळे केवळ एक रुग्णच नव्हे तर संपूर्ण घराची परेशानी होत असते.कॅन्सरचे वेळीच निदान झाले तर बरा होवु शकतो किंवा रुग्णाला चांगले आयुष्य मिळु शकते.यासाठी या रोगाचे तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत निदान होणे गरजेचे असल्याचे छत्रपती संभाजीनगर येथील कॅन्सरतज्ञ डॉ.शैलेश अग्रवाल यांनी सांगितले.राज्याच्या पशुसंवर्धन व हवामान बदल मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कॅन्सर रोग निदान शिबिरात ते बोलत होते.

ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक सेवा उपक्रमात वेदांत होमिओ क्लिनिक, नाथ रोड,औद्योगिक वसाहत येथे रविवार, २७ जुलै रोजी सकाळी ११ ते ३ या वेळेत कॅन्सर रोगनिदान शिबीर घेण्यात आले.यावेळी डॉ.शैलेश अग्रवाल, कर्करोग तज्ञ छत्रपती संभाजीनगर,डॉ.उत्पल गायकवाड रेडिएशन कर्करोग तज्ञ,डॉ.केतन शिरसाट मेडिकल ऑनकोलॉजिस्ट,भाजपा शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे,डॉ.ज्ञानेश्वर घुगे, भाजयुमो जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे, जेष्ठ भाजप नेते श्रीराम मुंडे, डॉ. सोमनाथ मुंडे, डॉ. प्रविण खाडे साहेब, डॉ. सौ.पुजा तोतला आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविकात भाजपा शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे यांनी ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमांचे उद्देश व मिळणारा प्रतिसाद सांगितला. परळी शहरात ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी कार्यक्रम होत असल्याबद्दल उपस्थितांनी आयोजकांचे कौतुक केले या शिबिरात तोंड आणि जिभेवर दीर्घकाळ टिकणारे फोड,डाग,आवाज बदल,थायरॉईड नोडयुल,अन्न गिळण्यात अडचण व वेदना,तंबाखू गुटख्यामुळे तोंड कमी उघडणे,तोंडातून रक्त येणे तसेच भरून न येणारी जखम,अचानक कमी होणारे वजन,शरीरावर आलेली गाठ,सततचा ताप,थकवा,भूक न लागणे असे लक्षणे असणाऱ्या १०८ रुग्णांची तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानोबा सुरवसे तर आभार प्रदर्शन अश्विन मोगरकर यांनी केले.

यावेळी नितीन समशेट्टी ,प्रितेश तोतला , अश्विन मोगरकर, सचिन गिते,मोहन जोशी,अरुण पाठक, प्रशांत कराड, राजेंद्र ओझा, उमेश खाडे, रोहिदास बनसोडे, बाळासाहेब कराळे,माऊली सुरवसे, अनीश अग्रवाल,अच्युत जोगदंड, उमेश निळे, सुरेश सातभाई, गजानन गिते,अमोल डुबे, विजय खोसे,सुशील हरणगुले,नारायण गरजे,राजेश ताटीपामळ, शैलजा आडोडे, राहुल घोबाळे, शेख शमी,शेख अनिस, खालेद राज, खदिर भाई, योगेश मुंडे,संकेत बारटक्के,विराज गिते, वैजनाथ पवार, शेख यासिन, आसलम खान, आदी उपस्थित होते

# जिल्हा वाहतुक शाखेची नेकनूर परिसरात कारवाई

## १०९ केसेस करुन ७३ हजाराचा ठोठावला दंड

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा वाहतुक शाखेच्या वतीने पोलीस अधिक्षक नवनीत, अप्पर अधिक्षक सचिन, जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष, नेकनूर पोलीस स्टेशनचे गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली नेकनूर येथे आज आठवडी बाजार असल्याने बसस्टॅण्ड वरल मुख्य रस्त्याचा परिसरात वाहतुकीस अडथळा आणणाऱ्या व वाहन नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १०९ वाहनधारकांवर कारवाई करुन ७३ हजार रुपये दंड ठोठावण्यात आला व एकाविरुद्ध लायसन निलंबन प्रस्ताव पाठविण्याची तजवीज ठेवली आहे. वाहतुक शाखेने केलेल्या या कार्यवाहीमुळे बेकायदेशीर वाहनधारकांची धांदल उडाली होती.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, जिल्हा वाहतुक शाखेने आज विशेष मोहीम अंतर्गत नेकनूर परिसरात बेकायदेशीर वाहन



धारकांना लगाम लागावा व वाहनाच्या नियमामध्ये सातत्य राहावे या हेतूने पोलीस उपनिरीक्षक विजय यांच्या सहकार्याने सकाळी १० वाजण्याच्या सुमारास नेकनूर परिसरात आज आठवडी बाजाराचा दिवस असल्याने रस्त्यावरील नो पार्कींग वाहनांवर व रस्त्यावर वाहने उभे करुन वाहतुकीस अडथळा आणणाऱ्या वाहनांवर तसेच विमा नसणे, पीयुसी नसणे, लायसन्स नसणे, हेल्मेट नसणे या सदराखाली १०९ वाहनधारकांवर कारवाई करुन ७३ हजार रुपये दंड ठोठावला असून नियमभंग करणाऱ्यांवर पोलीस कारवाई करण्यात आली आहे.

या कामीच पोलीस उपनिरीक्षक विजय यांच्यासह पोलीस हवालदार सखाराम, पोलीस नाईक आदिनाथ, पोलीस अंमलदार टुले, शेख, नेकनूर पो.स्टे.चे खाडे व कदम, पोलीस ड्रायव्हर नारायण यांनी सहभाग नोंदवला तसेच विनाकागदपत्रे वाहने चालवू नका, वाहनांचे नियम पाळा, वाहतुकीस विनाकारण अडथळा करु नका असे आवाहन जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष यांनी केले आहे.

# वैद्यनाथ विद्यालयाच्या १९९८-९९ बॅचचा भव्य स्नेहमेळावा



परळी। प्रतिनिधी

वैद्यनाथ माध्यमिक विद्यालय माधवबाग, परळी वैजनाथ येथील १९९८-९९ एस.एस.सी. बॅचचा ''माजी विद्यार्थी स्नेहमेळावा'' मोठ्या उत्साहात आणि जिव्हाळ्याच्या वातावरणात पार पडला. तब्बल २६ वर्षांनंतर जुन्या मित्रांनी पुन्हा एकत्र येत आठवणींच्या विश्वात रममाण होण्याचा अविस्मरणीय क्षण अनुभवला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या परिसरात करण्यात आली. गुलालासारखे हसू, ओळखीचा आनंद आणि डोळ्यांत पाणी आणणाऱ्या आठवणी या साऱ्यांनी वातावरण भारून टाकलं होतं. सर्व माजी विद्यार्थ्यांनी पारंपरिक फेटे परिधान करून शाळेप्रती आपली अभिमानाची भावना व्यक्त केली.

सी.जी.सर, कापसे सर, गुळभिले सर यांची उपस्थिती सी.जी. सर यांना कार्यक्रमादरम्यान आठवणींना उजाळा देत असताना अश्रू अनावर झाले गुरुजनांचा मान-सन्मान व सत्कार

१९९८- ९९ बॅचच्या आठवणींवर आधारित संवाद व अनुभव कथन शाळेच्या जुन्या परिसराचा दौरा व भावनिक क्षण पुन्हा एकदा शाळेत ही भावना अनुभवणारा सांस्कृतिक कार्यक्रम शाळा, विहीर, मंदिर प्रत्येक कोपरा आठवणींनी गच्च भरलेला वाटत होता.

जुन्या मित्रांचे आलिंगन, शिक्षकांचे मार्गदर्शन, आणि एकमेकांबद्दलचा स्नेह पाहून अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. कार्यक्रमाच्या अखेरीस सर्व माजी विद्यार्थ्यांनी पुढील स्नेहमेळाव्याचे नियोजन करण्याचा निर्धार व्यक्त केला. ''शाळा एक वेळा संपते, पण तिच्या आठवणी आयुष्यभर सोबत राहतात'', हे या कार्यक्रमाने पुन्हा एकदा सिद्ध केलं.

# श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे किसन बाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त सप्ताह आयोजन

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत सद्गुरु किसनबाबा महाराज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या २७ व्या पुण्यमारणार्थी श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह आयोजन ह.भ.प. शांतीब्रम्ह गुरुवर्य श्री नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे दि. ०२ ऑगस्ट शनिवार रोजी आरंभ होणार आहे.

दि. ०२ ऑगस्ट शनिवार रोजी दीप प्रज्वलन ह.भ.प. महंत शिवाजी महाराज श्री क्षेत्र नारायणगड, ह.भ.प गोपाळ म. शास्त्री पोखरी, ह.भ.प उद्धव म. चोले खडकी, कलश पूजन ह.भ.प महादेव महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी, ह.भ.प महादेव महाराज राऊत जवळा, ह.भ.प. भागवत म. पुरी श्री क्षेत्र पंचमुखेश्वर भाटेपुरी, गुरूची प्रतिमा पूजनः ह.भ.प शांतीब्रम्ह माठाधिपती नवनाथ बाबा महाराज, गाथा पूजन, ज्ञानेश्वरी पूजन, टाक पूजन, विना पूजन, मृदुंग पूजन, हार्मोनियम पूजन हे होईल. या नंतर फुल टाकण्याचा कार्यक्रम होऊन व्यासपीठ पूजन होईल. अखंड हरिनाम सप्ताह आरंभ होईल.



दि. ०२ऑगस्ट शनिवार रोजी रात्री ०९ ते ११वा. या वेळेत ह.भ.प समाजप्रबोधनकार निवृत्ती म. इंदोरीकर यांचे कीर्तन दि. ०३ ऑगस्ट रविवार रोजी ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज सांगळे यांचे कीर्तन, दि ०४ ऑगस्ट सोमवार रोजी ह.भ.प. शंकर महाराज शेवाळे, ०५ ऑगस्ट मंगळवार सचिन महाराज ढोले, दि ०६ऑगस्ट बुधवार ह.भ.प. विशाल महाराज खोले, दि. ०७ ऑगस्ट गुरुवार रोजी ह.भ.प.जगन्नाथ महाराज पाटील, दि.०८ ऑगस्ट शुक्रवार रोजी ह.भ.प.विश्वनाथ महाराज वारिंगे कोकणरत्न यांचे कीर्तन सेवा होणार आहे. दि. ०९ ऑगस्ट शनिवार रोजी १२ ते ०२ वा. ह.भ.प. संजयजी महाराज पाचपोर, रामायणाचार्य बुलढाणा विदर्भ यांचे काल्याचे कीर्तन होईल व नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे

# उत्तम कर्तृत्व आणि दुरदृष्टी यातून उत्तम नेतृत्व साकारते - डॉ. नरेंद्र निळेकर

माजलगाव । प्रतिनिधी

येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात आयोजित विद्यार्थी नेतृत्व गुण विकास शिबीराच्या उदघाटन प्रसंगी डॉ. नरेंद्र निळेकर बोलत होते यावेळी त्यांनी सांगितले की, नेतृत्वाचे गुण विद्यार्थी दशेतच विकसित होत असतात सामाजिक, धार्मिक, प्रशासन, राजकीय क्षेत्रात उत्तम नेतृत्व साकारण्यासाठी कर्तव्यदक्ष आणि दुरदृष्टी हे गुण महत्त्वाचे आहे. या शिबीराचे उदघाटन शिबीर गीत, दिपप्रज्वलन व माता सरस्वतीचे पूजन करुन झाले. या प्रसंगी सत्राचे अध्यक्ष केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड हे होते तर व्यासपीठावर माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शिबीर निरीक्षक श्रीमती सोनल तांबट, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर इत्यादी उपस्थित होते.

यावेळी प्रशांत भानप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, या सत्राचे अध्यक्षीय समारोप करताना प्रकाश दुगड यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासावर



लक्ष केंद्रित करताना मोबाईल च्या व्यसनापासून दूर रहावे. प्रास्ताविक मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर यांनी केले. हे शिबिर एकुण चार सत्रात संपन्न झाले. दुसऱ्या सत्रात प्रा. डॉ. गजानन होन्ना यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विविध आयमांचा परिचय व कार्य याविषयी मार्गदर्शन केले. तिसरे सत्र विद्या सभेच्या अभ्यासपुरक मंडळांतर्गत वर्ग प्रतिनिधी, संस्कार, ज्ञानोपासक, कलोपासक, बलोपासक, विज्ञान मंडळ इत्यादी मंडळ प्रमुख विद्यार्थ्यांची आयामशः (मंडळशः) बैठक चौथे सत्र समारोप सत्र होते. या सत्राचे अध्यक्ष केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त संगीत अध्यापक प्राणेश पोरे तर व्यासपीठावर प्रशांत भानप, श्रीमती सोनल तांबट, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर इत्यादी उपस्थित होते.यावेळी प्राणेश पोरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप करताना अमरनाथ खुर्पे यांनी सांगितले की, विद्यार्थी नेतृत्व गुण विकास शिबीरातून विद्यार्थ्यांच्या मन, मस्तक,मनगट यांचा विकास होण्यासाठी उपयोगी होतो, उत्तम नेतृत्व निर्माणासाठी कर्तृत्व, दातृत्व आणि वक्तृत्व इत्यादी गुण आवश्यक आहे. देशाला विविध क्षेत्रात भावी उत्तम नेतृत्व अशा शिबीरातून मिळावेत हाच या शिबीराचा उद्देश आहे.या शिबीराचे अहवाल वाचन अभ्यास पुरक मंडळ प्रमुख श्रीमती अपर्णा मुळे यांनी केले.या शिबीरातील सर्व सत्राचे सुत्रसंचलन, आभार,सर्व विद्यार्थ्यांनी केले.

# नांदेडच्या एकाच अपिलार्थीचे ८१ अपील राज्य माहिती आयोगाने फेटाळले

## १९ अपिलार्थींचे ७ हजार ५६७ व्दितीय अपील फेटाळले

बीड। प्रतिनिधी

नांदेड येथील जनक रामराव गायकवाड या अपिलार्थीने राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत दाखल केलेले ८१ द्वितीय अपील आयोगाने फेटाळले आहेत. यासोबतच १९ अपिलार्थींनी दाखल केलेले ७ हजार ५६७ व्दितीय अपील आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळले आहेत.अपिलार्थी यांनी विविध ग्रामपंचायत कार्यालयाकडे ८१ माहितीचे अर्ज सादर केलेले आहेत. अशा मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज करणाऱ्या खालील नमूद अपिलार्थी यांची द्वितीय अपिले आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळलेली आहेत. आयोगाकडील सदरील निर्णय आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहेत.बहुतांश अपिलार्थी कार्यालयाकडे वारंवार अर्ज सादर करतात. अपिलार्थी व्यक्तिशः माहितीची मागणी करुन त्याप्रमाणे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कार्यालयात उपस्थित राहत नाहीत. अपिलार्थी यांनी जेवढ्या ग्रामपंचायत कार्यालयाकडे माहिती अर्ज सादर केले त्या सर्व ग्रामपंचायत कार्यालयात स्वतंत्र जन माहिती अधिकारी पदनिर्देशित आहेत. मात्र अशा सर्व जन माहिती अधिकारी यांचेसाठी केवळ एकच प्रथम अपिलीय अधिकारी पदनिर्देशित आहेत. बहुतांश वेळा अपिलार्थी जेवढे माहितीचे अर्ज दाखल करतात जवळजवळ तेवढेच प्रथम अपिले दाखल करतात. या परिस्थितीत दैनदिन कामकाज सांभाळून अपिलाची यांच्या दाखल प्रथम अपिलावर कार्यवाही करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. मोठ्या संख्येने प्राप्त झालेल्या अर्जाचा विपरित परिणाम दैनंदिन शासकीय कामकाजावरुन होऊन सर्वसामान्य नागरिकांना नैसर्गिक न्याय देता येणे शक्य होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपिले दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नसल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे अशा स्वरुपाचे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी विविध ग्रामपंचायत कार्यालयाकडे ८१ माहितीचे अर्ज सादर केलेले आहेत या अपिलार्थी यांची व्दितीय अपिले आयोगाने सुनावणी घेऊन फेटाळलेली आहेत. आयोगाकडील सदरील निर्णय आयोगाच्या या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणात संबंधितांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद तसेच मा. सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग यांनी वेळोवेळी पारित केलेले निर्णय विचारात घेता, एकाच व्यक्तीने मोठ्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत अपेक्षित नाही. यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास / प्राधिकरणास वेठीस धरत आहेत. त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये, प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा मोठ्या स्वरुपात अर्ज करण्याच्या सवयीमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडून सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे, त्या महत्वाच्या शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्थान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येत आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे.

cmyk

# भाजी विक्रेते रस्त्यावरच करतात भाजी विक्री

## नागरिक, विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास; वाहातुकीची कोंडी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**शहरातील मुख्य रस्त्यावर शुक्रवारी बाजार भरतो परंतु दररोज या रस्त्यावर ठिकठिकाणी भाजी विक्रेत्यांनी अतिक्रमण करून थेट रस्त्यावरच भाजीपाला विक्रीला ठेवला आहे. यामुळे वाहनचालकांना व पादचार्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असून, विद्यार्थ्यांच्या व नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.**

विशेषतः या रस्त्यावर शाळा व महाविद्यालयीन वेळेस गर्दीचे प्रमाण अधिक असल्याने वाहतूक कोंडी आणि अराजकता पाहायला मिळते. नगर परिषद व पोलीस प्रशासनाने वेळोवेळी कारवाई केली असली तरी पुन्हा विक्रेते त्या जागेवर व्यवसाय सुरू करतात.नागरिकांनी यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. अंबाजोगाई शहरातील बाजारपेठ किंवा मोकळ्या जागांमध्ये भाजी विक्रेत्यांसाठी विशेष व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



### वाहनचालक व पादचाऱ्यांचे हाल

शहरातील शुक्रवारी बाजारपेठ भरल्यामुळे संध्याकाळी मोठ्या प्रमाणावर ट्राफिक जाम होत आहे. रस्त्यावर फळे, भाजीपाला, किराणा व इतर वस्तूंच्या दुकानांचे अतिक्रमण आणि पार्किंगची विस्कळीत व्यवस्था यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. विशेषतः कार्यालयीन वेळा, शालेय वेळा आणि आठवड्याच्या बाजाराच्या दिवशी गर्दीचा कहर वाढतो. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात, त्यामुळे रुग्णवाहिकांना मार्ग मिळवणे अवघड होते. स्थानिक व्यापारी, विक्रेते आणि वाहनधारक यांच्यात वेळोवेळी वादही होतात. नागरिकांनी बाजारपेठेच्या नियोजनासाठी आणि वाहतुकीच्या शिस्तीसाठी नगरपालिका व पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे ठोस उपाययोजना करावी, अशी मागणीही नागरीकांनी केली आहे. शहरात स्वतंत्र वाहतूक व्यवस्थापनाची व पार्किंगची गरज आता अधिक तीव्र झाली आहे.

# दिंद्रुडचा कोतवाल शुभम बनला राज्य राखीव पोलीस दलातील जवान

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**नऊ वर्ष महसूल मंडळात कोतवाल म्हणून काम केले, पोलीस दलात जाण्याची आईची इच्छा पूर्ण करण्यासाठी बंद खोलीत अभ्यास केला, रात्रंदिन अंग मेहनत घेतली, शेवटी फळ मिळाले आणि दिंद्रुड चा कोतवाल शुभम राज्य राखीव पोलीस दलातील जवान झाला.**



माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड नजदीक असलेल्या चोपनवाडी हे शुभम काटेचे गाव आहे. घरची परिस्थिती प्रचंड हालाखीची, आई सविता या आशा वर्कर तर वडील मुकुंद हे शेतात काम करतात. नऊ वर्षांपासून शुभमने कोतवाल म्हणून दिंद्रुड तलाठी सज्जात काम केले.राज्यराखीव पोलीस दलातील मामाची प्रेरणा घेत मला ही पोलीस व्हावे हि आईची इच्छा पुर्ण करायची होती.त्यासाठी गेल्या ४ वर्षांपासून कोतवाल हि जवाबदारी पार पाडत अभ्यास व प्रचंड अंग मेहनत घेतली. दिंद्रुड सज्जाचे तलाठी प्रमोद चव्हाण सह आई वडिलांनी

◀◀ पान ३ वर

# प्राचार्य डॉ.बी.आय. खडकभावी रोटरी भूषण पुरस्काराने सन्मानित



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.आय.खडकभावी यांना रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने दिला जाणारा रोटरी भूषण पुरस्कार शुक्रवारी सायंकाळी एका भव्य समारंभात प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफल, सन्मानपत्र व स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते.**

या पुरस्कार समारंभासाठी प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लबचे भावी प्रांतपाल जयेश पटेल, उपप्रांतपाल प्रविण देशपांडे, रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा.रोहिणी पाठक, सचिव मंजुषा जोशी, माजी अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी, सौ.शोभा खडकभावी, पारूल पटेल, शर्मिला देशपांडे यांची उपस्थित होती.

# धानोरा रोड व अंकुश नगर रोडसाठी आज खड्ड्यात लोटांगण आंदोलन

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या १० वर्षापासून शहरातील नगर रोड ते पालवन चौक असलेल्या अगदी पावणे दोन किलोमीटर रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे. त्याचबरोबर मदर तेरेसा चौक ते अंकुश नगर मुख्य रस्ता, विठ्ठल चौक पर्यंत हा रस्ता गेल्या १५ वर्षापासुन केलाच नाही. परंतु याकडे नगरपरिषद तसेच जिल्हा प्रशासन दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे येणाऱ्या २९ जुलै तारखेला धानोरा रोडच्या मुख्य रस्त्यामधील खड्ड्यामध्ये लोटांगण आंदोलन केले जाणार आहे.**

त्यामुळे या रस्त्याचे रुंदीकरण नूतनीकरण व कॉंक्रिटीकरण करण्याच्यादृष्टीने नगरपरिषदेने सुवर्ण जयंती नगरोत्थान मधून प्रस्ताव दाखल केला आहे



याला तांत्रिक मान्यता मिळाली असून प्रशासकीय मान्यता बाकी आहे असे असले तरी या रस्त्याच्या कामात भूसंपादन प्रक्रियेमुळे मोठी अडचण निर्माण झाली आहे. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना, महिला, वृद्ध नागरिक, व्यापारी,

◀◀ पान ३ वर

# खा. बजरंग सोनवणे यांच्या संकल्पनेतून दिव्यांगासाठीच्या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**आष्टी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या संकल्पनेतून येडेश्वरी फाउंडेशन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्ष दिव्यांग सेल बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आष्टी येथे दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी कृत्रिम अवयव सहाय्यभूत साधने मोफत वाटपासाठी पूर्व तपासणी व नोंदणी शिबिर शुक्रवारी दि.२५ जुलै रोजी घेण्यात आले नागरिकांनी या शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद देत ९०० दिव्यांग व जेष्ठ नागरीकांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रदेश युवक अध्यक्ष मेहबूब भाई शेख, ज्येष्ठ नेते आण्णासाहेब



चौधरी, मा. जिल्हा परिषद अध्यक्ष डॉक्टर शिवाजीराव राऊत, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी युवक तालुका अध्यक्ष विजय अण्णा गाढवे, रिजवान भाई शेख, भुसारीसाहेब केज गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने, विक्रमजी पोकळे, समाजसेवक अशोक अण्णा पोकळे, डॉ संतोष जाधव, आरोग्य दूत रामेश्वर जी गवळी, शिरिष थोरवे, राजेंद्र लाड सर, संदीपजी जगदाळे, सोनू तळेकर, सुरेश पवार राजकुमार थेटे, राम खिळे आदी उपस्थित होते. यावेळी मनोगत व्यक्त करताना महेबूब शेख म्हणाले की खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी चांगला उपक्रम राबवला असून हा उपक्रम दिव्यांग बांधवांसाठी स्तुत्य असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

# अंबाजोगाईत तिर्रट जुगार खेळणाऱ्या ११ जणांना अटक, १३ लाखांहून अधिकचा मुद्देमाल जप्त

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**शेपवाडी परिसरातील हॉटेल उमेश बिअर बार मध्ये तिर्रट नावाचा जुगार खेळला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने शुक्रवारी सायंकाळी छापा टाकून ११ जणांना अटक केली. यावेळी एकूण १३ लाख ७४ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

शेपवाडी परिसरातील उमेश बिअरबार येथे जुगार सुरू असल्याची गुप्त माहीत शहर पोलिसांना मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे संध्याकाळी ७.३० वाजता शहर पोलिसांच्या पथकाने बारवरील वरच्या मजल्यावर छापा टाकला.



यावेळी पोलिसांना तेथे काही इसम गोलाकार पद्धतीने बसून जुगार खेळताना मिळून आले. पोलिसांनी त्या ठिकाणाहून नगदी रक्कम, विविध प्रकारचे मोबाईल फोन्स आणि स्कॉर्पिओ वाहन असा एकूण सुमारे १३ लाख ७४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जुगार खेळताना अटक करण्यात आलेल्या व्यक्तींमध्ये रविशंकर मुंडे (वरवटी), धनराज फड (कन्हेरवाडी), कुलदीप शेप, नितीन शेप, विराज काटकर, आप्पाराव लाड, किशोर उंदरे, धनराज चाटे, अमोल पाचंगे, सतीश शेप, प्रदीप शेप (सर्व अंबाजोगाई व परळी परिसरातील) यांचा समावेश आहे. सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम ४ आणि ५ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनित कॉवत, अपर अधीक्षक चेतना तिडके, उपअधीक्षक अनिल चोरमले यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई ठाण्याचे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, पोउपनि आनंद शिंदे आणि पोलीस कर्मचारी अमोल गायकवाड, श्रीकृष्ण वडकर, दत्तात्रय इंगळे, पांडुरंग काळे, हनुमंत चादर, रविकुमार केंद्रे, प्रविणकुमार गित्ते, भागवत नागरगोजे यांनी केली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे करत आहेत

# मंत्री पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस भाजपच्या वतीने सहारा अनाथालयात साजरा

**गेवराई । प्रतिनिधी**

**राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस हा गेवराई भाजपाच्या वतीने सामाजिक उपक्रमाचा सेवा सप्ताह म्हणून साजरा करण्यात आला. यांत अनेक ठिकाणी शालेय साहित्य, गणवेश, मिठाई वाटप, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी, रक्तदान शिबीर, नेत्र तपासणी शिबीर, पशु लसीकरण व तपासणी, मंदिरात महाआरती, भोग, भंडारा असे अनेक उपक्रम विविध ठिकाणी राबविण्यात आले.**

याचाच भाग म्हणून सहारा अनाथालय, (बालग्राम प्रकल्प) गोविंदवाडी गेवराई येथील मुलांना भाजपा गेवराई विधानसभा




समन्वयक श्रीकांत सानप यांच्या वतीने वाढदिवसाच्या दिवशी भोजनाची व्यवस्था करण्यात आली. तसेच वैद्यकीय आघाडीचे उपाध्यक्ष डॉ.अभय वणवे यांच्या वतीने क्रीडा साहित्य, व आरोग्य तपासणी उपक्रम देखील राबविण्यात आला.यावेळी प्रमुख म्हणून उपस्थित असलेले जिल्हा सरचिटणीस प्रा.देविदास नागरगोजे यांनी विद्यार्थ्यांना अमूल्य असे मार्गदर्शन केले. व पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस एक सामाजिक भान ठेऊन सामाजिक सेवा उत्सव म्हणून साजरा करण्यात आल्याचं सांगितले. यावेळी,जिल्हा सरचिटणीस प्रा.देविदास नागरगोजे सर, गेवराई विधानसभा समन्वयक श्रीकांत सानप, वैद्यकीय आघाडी उपाध्यक्ष डॉ.अभय वनवे, अनाथालयाचे प्रमुख संतोषजी गर्जे, भाजपा नेते पी.टी.चव्हाण, सुघोष जी मुंडे, मंडळ अध्यक्ष सचिन दाभाडे, तत्त्वशील कांबळे, महादेव आण्णा धोंडरे, तालुका सरचिटणीस संतोष थोरात, कोषाध्यक्ष सुशील भोपळे, बाबासाहेब घोडके, पप्पू खेडकर, संदीप उघडे, स्वप्निल ढाकणे, कृष्णा बारगजे, सुनील ढाकणे, भागवत उघडे, युवराज ढाकणे, साईनाथ उघडे ,प्रदीप सानप, महारुद्र सानप,जगन्नाथ उघडे,इस्माईल सय्यद, अमोल ढाकणे,आणि सर्व शिक्षकवृंद ,विदयार्थी, भाजपा कार्यकर्ते पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

# प्रकाश सोळंके यांना कॅबिनेट मंत्रीपद द्यावे –राजेंद्र जगताप

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळाचा आज पर्यंतचा आढावा घेता, कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस ने सत्ता काळात बीड जिल्ह्यातुन माजी उपमुख्यमंत्री स्व.सुंदरराव सोळंके यांच्या खेरीज खुल्या प्रवर्गातून कोणालाही कॅबिनेट मंत्री म्हणून काम करण्याची संधी आजतागायत कोणालाही मिळाली नाही.

बीड जिल्ह्यातून ज्यांना ज्यांना कॅबिनेट मंत्रीपदी काम करायला मिळाले त्यात प्रामुख्याने जयदत्त क्षीरसागर यांनी तब्बल सोळा वर्ष,



विमल मुंदडा यांनी अकरा वर्ष, धंनजय मुंडे यांनी पाच वर्ष कॅबिनेट मंत्री म्हणून काम केले. महाराष्ट्र राज्य सरकार मध्ये पुन्हा एकदा मंत्रीपदाचे फेरबदल होण्याचे संकेत मिळू लागले आहेत, काही मंत्री वाद विवादात सापडत असून काही मंत्र्यांना आपल्या खात्यामध्ये पुरेशी समाधानकारक कामगिरी करता आलेली नाही हे लक्षात आल्याने विद्यमान मंत्रिमंडळातुन लवकरच काही विद्यमान मंत्र्यांना पद सोडण्याची वेळ येऊ शकते तर काहींना मंत्री पदाची लॉटरी लागू शकते. या वातावरणात बीड जिल्ह्यातून प्रकाश सोळंके यांच्यासारख्या अत्यंत अनुभवी व्यक्तीला कॅबिनेट मंत्रीपद दिले गेले तर

◀◀ पान ३ वर

# मा.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे याच्या वाढदिवसा निमित्ताने वृक्षारोपन

**केज । प्रतिनिधी**

लोकनेत्या मा.पंकजाताई मुंडे यांच्या यांच्या वाढदिवसानिमित्त टाकळी येते प्रत्येक घर एक झाड हि संकल्पना घेऊन सुरज घुले यांनी आपल्याला सर्वाचे नेतृत्वाची उंचीला शोभेल असा कार्यक्रम आपल्या गावात करावा या इच्छेने प्रत्येक घरी एक फळझाड या उद्देशाने आज ५०० फळझाडांचे उद्देश पूर्ण केले.

या कार्यक्रमांमध्ये प्रमुख उपस्थिती म्हणून भारतीय जनता



पार्टीचे ज्येष्ठ नेते आदरणीय काकाजी, इन्फंट इंडिया चे सर्वेसर्वा दत्ताजी बारगजे, ज्येष्ठ नेते सुनील आबा गलांडे,ज्येष्ठ नेते रामकृष्ण घुले काका, भाजपा तालुकाध्यक्ष भगवान केदार, सोसा चेअरमन रघुनाथ जी बारगजे,

◀◀ पान ३ वर

# विदेशी मद्याचे भाव वाढल्याने तळीरामांचा हातभट्टीकडे कल

**आष्टी । प्रतिनिधी**

सध्या महाराष्ट्र शासनावर लाडकी बहीण योजनेमध्ये महिलांना दिलेल्या अनुदानावर मोठ्या प्रमाणावर खर्च झाल्याने सरकारी तिजोरीवर मोठा भर पडल्याने सरकारने आता हा झालेला खर्च हा मदय विक्रीचे परवाने तसेच देशी-विदेशी दारूचे भाव मोठ्या प्रमाणावर वाढल्याने तळीरामांची मोठी पंचायत झाली आहे सध्या महाराष्ट्र शासनाकडून कसलेही अनुदान वितरित होत नाहीये सध्या मार्केटमध्ये सुखसुख काट आहे त्यातच दारूचे दर मोठ्या प्रमाणावर वाढल्याने तळीराम हे आता गावठी हातभट्टीकडे वळण्याचे चित्र सध्या पाहावयास मिळत आहे कधी नव्हे ते एकदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर भाव वाढ झाल्याने दारू विक्री करणाऱ्यांना देखील मोठ्या प्रमाणावर टॅक्स भरून देखील ग्राहक नसल्याने परमिट रूम वाल्यांची देखील मोठी पंचायत झाली आहे.



# लातूर ते परळी शिव कावड यात्रा दिंडी परळीत दाखल

**परळी । प्रतिनिधी**

श्रावण महिन्यात पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेण्यासाठी लातूर ते परळी भव्य दिव्य शिव कावड यात्रा दिंडी निघाली.लातूरच्या मोतीनगर भागातील ललितकुमार बालकिशन शर्मा परिवाराच्या वतीने आयोजित केलेली महादेवाची शिव कावड यात्रा, रविवार, २७ जुलै रोजी सायंकाळी वैद्यनाथ नगरीत दाखल झाली.

पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैजनाथ भगवान चे दर्शन घेण्यासाठी लातूर येथून २५० भाविकांचा सहभाग असलेली महादेवाची कावड यात्रा दिंडी रविवारी सायंकाळी परळीत दाखल झाली. हर हर महादेव, जय भोले, वैजनाथ भगवान की जय असा जय हो उपस्थित भाविकांनी दिल्याने वातावरण भक्तीमय झाले होते.

या यात्रेला ढोल ताशांच्या गजरात आणि शेकडो भाविकांच्या उत्साही उपस्थितीत एक विशेष धुमधडाका पाहायला मिळाला. यात्रेच्या स्वागतासाठी परळी शहर व पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या प्रमाणावर तयारी केली होती, ज्यामुळे यात्रा पारंपरिक धार्मिक उत्सवात रूपांतरित झाली. भाविकांच्या धार्मिक उत्साहात आणि कावड यात्रेतील आध्यात्मिक उंचीने वातावरण पुर्णपणे पवित्र झाले. उद्या सोमवार दिनांक २८ जुलै रोजी दुपारी चार वाजता ही कावड यात्रा दिंडी लातूरकडे मार्गस्थ होणार आहे.





### शिव कावड यात्रेचे २४ वे वर्ष

लातूर शहरातील मोती नगर भागात राहाणारे कै.बालकीशन शर्मा यांनी २३ वर्ष आधी एका छोट्या प्रमाणात मोती नगर भागात राहाणारे मोजके मित्र व कांहीं नातेवाईक घेऊन हि शिवकावड पदयात्रा लातूर ते परळी काढली प्रति वर्षा हि पदयात्रा काढत असताना परिसरातील व नातेवाईक पदयात्रेत जोडत गेली आमच्या सोबत त्यांची पण या शिव कावड पदयात्रेत श्रद्धा वाढत गेली पाहता पाहता या शिव कावड़ ला अनेक वर्ष लोटत गेली अचानक काही महिने आधी बालकिशनजी (वडील) यांचे आजार पणा मुळे वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. आमचा मुख्य आधार गेला असल्याने आम्ही चारही भाऊ मनाने थोड खचलो प्रति वर्षाप्रमाणे श्रावण महिना आल्या नंतर आम्ही मनाचा निश्चय करून वडिलांच्या माघारी शिव कावड पदयात्रा काढायचे ठरवून तयारी ला लागलो आज वडीलांच्या निधनानंतर पण शिवकावड पदयात्रा काढत आहोत आज या यात्रेचे तेविसाव्या वर्ष आहे.

# मोकाट जनावरे , कुत्रे व वराहांचा बंदोबस्त करावा,नागरीकांचे नगर पंचायतला निवेदन

**आष्टी। प्रतिनिधी**

नगर पंचायत हद्दीतील शहर रस्त्यावर मोकाट जनावरांनी ठिय्या मारल्याने वाहतुकीस अडथळा झाला.त्यामुळे रस्त्यातच मोकाट जनावरांनी ठाण मांडल्याने वाहनचालकांना वेगावर नियंत्रण ठेवावे लागत होते.तसेच,जनावरांच्या बाजूने वळण घेत वाहनचालकांना रस्ता पार करून पुढे जावे लागत होते.तसेच शहर व परिसरात वराहाने विळखा घातला असून,मोठ्या प्रमाणावर पिकांची नासाडी हे जनावर करित असून याचा तात्काळ बंदोबस्त करावा नसता तीव्र आंदोलन करण्याचा इशारा गावक-यांना नगराध्यक्ष जिया बेग यांना दिलेल्या निवेदनातून केला आहे.

आष्टी नगर पंचायतचे नगराध्यक्ष यांना सोमवार (दि.२८)रोजी



शेतकरी व गावकरी यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शहरातील प्रभाग क्रं.५ मधील डोमकावळे मळा व सायकड वस्ती परिसरात डुकराने शेतातील पिकांची नासाडी करत असल्याने शेतीचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे.तरी या वराहांचा व मोकाट जनावरांचा तात्काळ बंदोबस्त करावा नसता आपल्या कार्यालयासमोर उपोषण करुन झालेल्या पिकांची नुकसानभरपाई आपणाकडून घेण्यात येईल असेही दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.या निवेदनाच्या प्रति तहसिलदार व पोलिस निरीक्षक यांना माहितीस्तव देण्यात आल्या आहेत. या बातमीमध्ये खडकत रोडवरील काही मंगल कार्यालयामध्ये मांसाहाराचे जेवण लग्न होत असल्याने या भागामध्ये कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर झाली असून हे कुत्रे माऊस खाऊन हिंसक झाले आहेत या कुत्र्यांचा देखील श्वानांचा बंदोबस्त करणे गरजेचे आहे

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# राष्ट्रवादीच्या युवक प्रदेशाध्यक्षपदी किशोर मासाळ यांना संधी मिळणार? अजित पवार यांच्या भूमिकेकडे लक्ष

**बारामती । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांच्या राजीनाम्यानंतर राष्ट्रवादीचा युवक प्रदेशचा चेहरा कोण असेल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. युवक उपाध्यक्ष किशोर मासाळ यांनी याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी केली असून अजित पवार यांच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सोशल मीडियात किशोर मासाळ यांच्या नावाने पोस्ट केल्या जात आहेत. गेले सात आठ वर्षापासून उपाध्यक्ष पदावर कार्यरत असलेल्या किशोर मासाळ यांच्याकडे युवक प्रदेशाध्यक्षाची धुरा अजित पवार सोपवणार का याकडे लक्ष लागले आहे.**



राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष सुरज चव्हाण यांना मारहाण प्रकरणी निलंबित केल्यानंतर राष्ट्रवादी युवक काँग्रेस अजित पवार गटाचा प्रदेशाध्यक्ष पदी कोणाची वर्णी लागणार याची जोरदार चर्चा सोशल मीडियामध्ये सुरू आहे. यामध्येच बारामती मधील किशोर मासाळ यांच्या नावाची जोरदार चर्चा समाज माध्यमांवर वेगवेगळ्या पोस्टच्या स्वरूपात वायरल होताना दिसत आहे.

किशोर मासाळ यांनी प्रदेश उपाध्यक्षपदी अनेक वर्षापासून कार्यरत आहेत. वेगवेगळ्या आंदोलनाच्या माध्यमातून ते नेहमीच चर्चेत राहिले आहेत. तत्कालीन लोकसभा अध्यक्ष सुमित्रा महाजन यांच्या चौंडी येथील कार्यक्रमांमध्ये धनगर आरक्षण विषयी निदर्शने केल्यानंतर त्यांना तुरुंगात देखील जावे लागले. राष्ट्रवादीत आल्यानंतर किशोर मासाळ यांनी एक आक्रमक चेहरा म्हणून आपली छाप सोडली आहे. युवकांचे संघटन कौशल्य त्यांच्याकडे आहे. त्यामुळे राज्यभरातून त्यांच्या अध्यक्ष पदाबाबत सोशल मीडियामध्ये पोस्ट केले जात आहेत. कार्यकर्ते भावना व्यक्त करत आहेत.

खरंतर किशोर मासाळ हे माजी युवक अध्यक्ष संग्राम कोते, मेहबूब शेख व सुरज चव्हाण या तीनही प्रदेशाध्यक्षांच्या नेतृत्वाखाली वरिष्ठ उपाध्यक्ष म्हणून त्यांनी आजपर्यंत काम पाहिले आहे, गेल्या आठ वर्षाच्या प्रवेशानंतरच्या कालावधीत त्यांनी वेगवेगळी केलेली आंदोलने ही लक्षवेधी ठरली आहेत, त्यांचे संघटनात्मक कौशल्य समाज माध्यमांवरील व प्रशासनावरील पकड यामुळे त्यांचा एक वेगळा चाहता वर्ग महाराष्ट्रामध्ये आहे. त्यामुळे युवक प्रदेशाध्यक्ष पदासाठी त्यांच्या नावाला जोर लावला जात आहे. किशोर मासाळ बारामतीचे रहिवासी आहेत, असे असले तरी देखील त्यांचे संघटन राज्यभर आहे. मासाळ यांनी अजित पवार यांच्याकडे याबाबत मागणी केली असून उपमुख्यमंत्री अजित पवार मासाळ यांना संधी देणार का याकडे लक्ष लागले आहे.

# मंदिराजवळ दरड कोसळली; पूजाऱ्यांचे घर क्षणात जमीनदोस्त

खालापूर । प्रतिनिधी

पुणे - मुंबई जुन्या महामार्गावरील बोरघाटातील शिंग्रोबा मंदिराजवळ रविवारी (दि. २७) सकाळी मोठी दरड कोसळून मंदिरातील दोन पूजाऱ्यांचे घर कोसळले. सुदैवाने या पूजाऱ्यांना वेळेवर धोक्याची जाणीव झाल्याने ते सुरक्षिततरित्या बाहेर पडले आणि मोठा अनर्थ टळला.कोकण आणि घाटमाथ्यावर गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने अनेक ठिकाणी भूस्खलन आणि दरड कोसळण्याचे प्रकार घडत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर बोरघाटातही प्रचंड पावसामुळे जमीन खचली आणि शिंग्रोबा मंदिराच्या शेजारी असलेले पूजाऱ्यांचे घर अचानक दरडीत गाडले गेले.



दरड कोसळण्याच्या काही क्षणांपूर्वीच पूजाऱ्यांनी बाहेर पडल्याने ते थोडक्यात बचावले. देव तारी त्याला कोण मारी या म्हणीप्रमाणे हे पूजारी सुदैवाने वाचले असल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.शिंग्रोबा देवाचे मंदिर हे बोरघाटातील एक श्रद्धास्थान असून, जुन्या मुंबई-पुणे मार्गावरून प्रवास करणारे वाहनचालक येथे थांबून देवाचे दर्शन घेतात. मंदिरातील पूजाऱ्यांसाठी मंदिराच्या शेजारीच राहण्याची व्यवस्था होती. मात्र, आता हे घर दरड कोसळल्याने पूर्णपणे जमीनदोस्त झाले आहे.या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. स्थानिक प्रशासन आणि आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या असून, आणखी दरड कोसळू नये यासाठी आवश्यक खबरदारी घेतली जात आहे. मुसळधार पावसामुळे डोंगर उतारांवरील गावांमध्ये आणि घाटमाथ्यावर दरड कोसळण्याचा धोका वाढत आहे. त्यामुळे नागरिकांना आणि यात्रेकरूंना आवश्यक काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# पुणे बाजार समिती उपसभापती दत्तात्रय पायगुडे यांचा राजीनामा

पुणे । प्रतिनिधी

पुणे बाजार समितीचे उपसभापती दत्तात्रय पायगुडे यांनी राजीनामा दिला आहे. पुणे बाजार समितीचे सभापती प्रकाश जगताप यांनी हा राजीनामा मंजुर केला आहे. दरम्यान ७ जुलै रोजी




दिलीप काळभोर यांनी सभापती पदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर १८ जुलै रोजी प्रकाश जगताप यांची सभापती पदी निवड झाली आहे. त्यानंतर आता उपसभापतींनी राजीनामा दिला आहे. संचालक मंडळ आल्यापासून पायगुडे तिसरे उपसभापती आहेत.आता चौथे उपसभापती बाजार समितीला मिळणार आहेत. दरम्यान उपसभापती पदासाठी नानासाहेब आबनावे, शशिकांत गायकवाड आणि मनिषा हरपळे यांची नावे चर्चेत आहेत. १३ सप्टेंबर २०२४ रोजी पायगुडे उपसभापती बनले होते.

# हिंदू धर्मातील नागरिकांचं ख्रिश्चन धर्मात परिवर्तन करण्याचा प्रयत्न, दोघांना अटक

पिंपरी । प्रतिनिधी

पुण्यातील पिंपरी कॅम्पमध्ये धर्मांतर करण्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी अमेरिकन नागरिक आणि भारतीय वंशाच्या नागरिकाला पिंपरी पोलिसांनी अटक केली आहे. येशूला देव माना इतर कुठलेही देव नाहीत. ख्रिश्चन धर्मात प्रवेश केल्यास सुख, समृद्धी लाभेल असे म्हणून पिंपरी कॅम्प येथे धर्मपरिवर्तनाचा प्रयत्न करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेफर जाविन जेकॉब , स्टीव्हन विजय कदम अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नाव आहेत. यांच्यासह १६ वर्षीय बालकाचा यात समावेश आहे. नोटीस देऊन पिंपरी पोलिसांनी त्याला सोडून दिले आहे. पिंपरी कॅम्पमध्ये अमेरिकन नागरिक असलेल्या शेफर जेकॉब आणि स्टीव्हन कदम हा हिंदू धर्मातील नागरिकांचं ख्रिश्चन धर्मात धर्मपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करत होता. नागरिकांच्या घराबाहेर जाऊन त्यांना आवाज देऊन येशू विषयी माहिती दिली जात होती.




**येशूलाच देव माना, दुसरा कोणताही देव नाही असं सांगून धर्मपरिवर्तन करण्याचा प्रयत्न**

पिंपरी कॅम्पमध्ये अमेरिकन नागरिक असलेल्या शेफर जेकॉब आणि स्टीव्हन कदम हा हिंदू धर्मातील नागरिकांचं ख्रिश्चन धर्मात धर्मपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करत होता. येशूलाच देव माना, दुसरा कोणताही देव नसल्याची माहिती हे दोघे नागरिकांना देत होते. ख्रिश्चन धर्मात सुख, समृद्धी लाभेल असे म्हणून पिंपरी कॅम्प येथील नागरिकांचे धर्मपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता.

ख्रिश्चन धर्म किती श्रेष्ठ आहे, हे सांगितलं जातं होत. ख्रिश्चन धर्म वगळता कुठलाच धर्म महत्वाचा नाही. या विश्वासात केवळ येशूच आहे. इतर धर्म केवळ कथा आहेत. इतर देवतांना न मानता तुम्ही येशूला माना असे सांगून नागरिकांना धर्मांतर करण्याचा प्रयत्न अमेरिकन नागरिक आणि भारतीय नागरिक असलेला स्थिव्हन कदम करत होता. ख्रिश्चन धर्मात धर्मपरिवर्तन केल्यास तुम्हाला सुख, समृद्धी, आरोग्य लाभेल. अस नागरिकांना पटवून दिले जात होत. पैशांचा देखील अमीष दाखवलं जात होतं. अखेर याप्रकरणी काही सजग नागरिकांनी थेट पिंपरी पोलीस ठाणे गाठून सर्व प्रकार सांगितला. पिंपरी पोलिसांनी तात्काळ अमेरिकन नागरिक आणि भारतीय नागरिकाला अटक केली आहे. अमेरिकन नागरिक शेफर जेकॉब हा एक वर्षाच्या मुदतीवर भारतात आलेला आहे.

# बिबवेवाडीत 'श्रावण क्वीन २०२५' उत्सव उत्साहात

**पुणे । प्रतिनिधी**

सत्यप्रभा स्टुडिओ आणि लोटस लँडमार्क प्रस्तुत 'कलादालन'च्या वतीने बिबवेवाडी झोनसाठी 'श्रावण क्वीन २०२५' हा सौंदर्य, कला आणि परंपरेचा उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमात श्रीरंग सोसायटीने विजेतेपद पटकावले. कार्यक्रमात मोठ्या प्रमाणावर सहभागींची उपस्थिती लाभली.


'कलादालन' हे नुसते एक इव्हेंट नसून, लोटस परिवारातील प्रत्येक सदस्यासाठी नृत्य, गायन, चित्रकला, हस्तकला यांसारख्या विविध कलेच्या माध्यमातून व्यक्त होण्याचे एक सृजनशील व्यासपीठ आहे. श्रावण क्वीन २०२५ ही स्पर्धा नसून एक पारंपरिक उत्सव असून, कौटुंबिक एकत्रीकरण आणि ओळखी वाढवण्याच्या उद्देशाने हा उपक्रम साजरा करण्यात आला, असे स्मिता गिरी (सह-संचालक, लोटस व सत्यप्रभा स्टुडिओ) यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महुआ नारायण पंढरपूर होत्या. परीक्षक म्हणून शुभांगी राजकुमार सोमवंशी (मालक,) आणि निष्ठिगंधा कापरे (डान्स कोरिओग्राफर) यांनी भूमिका पार पाडली.कार्यक्रमास मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेता, पुढील महिन्यात कोथरूड झोनसाठी देखील 'श्रावण क्वीन २०२५' उत्सवाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती गिरी यांनी दिली.




# चिंबळीतील के. टी. बंधारा धोक्यात; ग्रामस्थांची प्रशासनाकडे तातडीने दुरुस्तीची मागणी

**चिंबळी । प्रतिनिधी**

**खेड तालुक्यातील औद्योगिक क्षेत्रातील चिंबळी, कुरूळी, मोई, केळगाव आणि मरकळ परिसरात गेल्या दीड महिन्यापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने आठ ते दहा दिवस उघडीप दिली होती. यामुळे शेतकऱ्यांनी शेतीच्या मशागतीची कामे आणि सोयाबीन पिकाची खुरपणी सुरू केली होती. मात्र, गेल्या चार ते पाच दिवसांपासून पावसाने पुन्हा जोर धरल्याने शेतीची कामे रखडली असून खुरपणीची कामेही बंद पडली आहेत.**



मावळ परिसरात सतत पडणाऱ्या पावसामुळे इंद्रायणी नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. यामुळे नदीतील जलपर्णी वाहून गेली असली, तरी मोशी-चिंबळी हद्दीवरील इंद्रायणी नदीवरील महाराष्ट्र शासनाने बांधलेल्या के. टी. बंधाऱ्याला राडारोडा अडकला आहे. यामुळे बंधारा धोकादायक बनण्याची भीती स्थानिक ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूंना असलेले सिमेंटचे गड्डे तुटल्याने परिस्थिती आणखी गंभीर बनली आहे. ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे.

# तिकोना किल्ल्यावर पार पडली गडकिल्ले संवर्धन मोहिम; खासदार निलेश लंकेंचा पुढाकार

पुणे । प्रतिनिधी

पावसाळयामध्ये अनेकजण गडकिल्ल्यांवर फिरण्यासाठी जातात. मात्र गडकिल्ले हे केवळ फिरण्याचे ठिकाण नाही तर आपल्या इतिहासाचे साक्षीदार आहेत. त्यामुळे हे गडकिल्ले संवर्धन करणे आणि जतन करणे अत्यंत आवश्यक आहे. मावळ तालुक्यातील तिकोना गडावर गडकिल्ले संवर्धन मोहिमे राबवण्यात आली. या मोहिमेंतर्गत खासदार निलेश लंके प्रतिष्ठानच्या संकल्पनातून स्वच्छता व वृक्षारोपण पाचवी मोहीम पार पडली. यावेळी हजारो शिवभक्तांनी गडाची काळजी घेत यामध्ये सहभाग घेतला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील या मोहिमेत सहभागी झाले होते

खासदार निलेश लंके यांच्या संकल्पनेतून तसेच निलेश लंके प्रतिष्ठानच्या माध्यमातून महाराष्ट्रातील गड किल्ल्यावर श्रमदान वृक्षारोपण असे विविध गड किल्ले संवादाच्या दृष्टीने उपक्रम राबवले जातात. गडकिल्ले संवर्धनाच्या मोहिमेत मावळ तालुक्यातील तिकोना किल्ला हा पाचवा गडकिल्ला ठरला असून या किल्ल्यावर या मोहिमेअंतर्गत भर पावसात मल्लखांब प्रात्यक्षिक, झाडांचे संवर्धन करणे. ठिकठिकाणी डस्टबिन लावणे, वीज, फलक दुरुस्ती ही कामे करण्यात आली. यावेळी ५५ विद्यार्थ्यांनी प्रारंभी मल्लखांब प्रात्यक्षिके सादर केली. या गडकिल्ले संवर्धन मोहिमेचे नियोजन राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुक्याचे युवक अध्यक्ष विशाल वहिले, आफताब सय्यद, जिल्हाध्यक्ष अतुलजी राऊत, सोमनाथ धोंगडे भूषण आसवले किसन कदम पत्रकार ज्ञानेश्वर ठाकर विजय शिंदे अरुण वाघमारे अभिजीत सोनवणे स्थानिक ग्रामस्थ आदी जणांनी केले. यावेळी राष्ट्रवादी पुणे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे हे सामील झाले होते. यावेळी त्यांनी देखील श्रमदान करत गडकिल्ल्यांचे संवर्धन केले.



यावेळी शशिकांत शिंदे म्हणाले की, तिकोना गडावर येणे हे आमचे भाग्य आहे गडकिल्ले वाचवण्यासाठी शासनाची मदत मिळाली नाही तरी खासदार निलेश लंके लोकसह गातून गड संवर्धन करत आहोत या गडाच्या संवर्धनासाठी दहा कोटीचा प्रस्ताव प्रलंबित आहे त्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी व्यक्त केले आहे.

या मोहिमेत कोणतेही पक्ष व पदाला महत्व नाही

या गडकिल्ले संवर्धनाच्या मोहिमेबाबत खासदार निलेश लंके यांनी देखील आपली भूमिका स्पष्ट केली आहे. खासदार निलेश लंके म्हणाले की, सर्व जाती धर्माचे तरुण या मोहिमेत सहभागी होत आहे मुस्लिम समाजाचे शंभरहून अधिक मावळे या मोहिमत सहभागी झाले आहेत गड आपले प्रेरणास्थान आहे या मोहिमेद्वारे शिवकालीन वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे मत खासदार निलेश लंके यांनी व्यक्त केले आहे.

# शिरूरमध्ये स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई; ३ ठिकाणी धाडी, १२ किलो गांजा, साडे ३ लाखांचा गुटखा जप्त

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यात अवैध धंद्यांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेने मोठी मोहीम हाती घेतली असून, तीन वेगवेगळ्या ठिकाणी धाडी टाकत १२ किलो गांजा आणि ३.५६ लाख किमतीचा गुटखा असा एकूण सुमारे ४.७६ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवायांमध्ये चार आरोपींना अटक करण्यात आली असून, पुढील तपासासाठी त्यांना शिरूर पोलीस स्टेशनच्या तपास पथकाकडे सोपवण्यात आले आहे.



२५ जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कुलदीप संकपाळ यांच्या नेतृत्वाखालील पथक शिरूर परिसरात गस्त घालत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, दोन संशयित मोटारसायकलवरून गांजाची विक्रीसाठी आमदाबाद फाट्याकडे येत आहेत. शिरूर पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली मळगंगा लॉन्सजवळ सापळा रचून शुभम शंकर मोहीते (वय २९, रा. टाकळीहाजी) आणि विजय केमराज काळे (वय २९, रा. टाकळीहाजी) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून ४ किलो १८५ ग्रॅम गांजा (किंमत ८०,०००) आणि मोटारसायकल जप्त करण्यात आली. या प्रकरणी एन.डी.पी.एस. कायदा १९८५, कलम ८(सी), २०(ब) अंतर्गत शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या कारवाईत शिरूर येथील गुलमोहर अपार्टमेंट, बुरूड आळी येथे रफिक चाँद शेख (वय ३६) याच्या घरावर छापा टाकण्यात आला. यावेळी वेगवेगळया कंपन्यांचा ३,५६,७८१ किमतीचा गुटखा, तंबाखू आणि पानमसाला जप्त करण्यात आला. हे पदार्थ मानवी आरोग्यास घातक असल्याने कठोर कारवाई करत रफिक शेख याला अटक करण्यात आली. त्याच्याविरुद्ध बीएनएस कलम १२३, २७४, २७५, २२३ आणि डड-ख अधिनियम २००६ चे कलम २६(२)(ळ), २६(२)(ळळ), २६(२)(ळीं) अंतर्गत शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तिसरी कारवाई : मंगलमूर्ती नगरमधून ८ किलो गांजा जप्त

२६ जुलै २०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेला माहिती मिळाली की, रमेश उर्फ रमन रामभाऊ खराडे (वय ३३, रा. कामाठीपुरा, शिरूर) हा आपल्या घरात गांजा साठवून विक्री करत आहे. मंगलमूर्ती नगर येथे छापा टाकून ८ किलो गांजा (किंमत १,२०,०००) जप्त करण्यात आला. रमेश खराडे याला अटक करून एन.डी.पी.एस. कायद्यांतर्गत शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या तिन्ही कारवाया पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. यात पोलीस निरीक्षक संदेश केंजळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक कुलदीप संकपाळ, दीपक कारंडे, पोलीस कर्मचारी दिलीप पवार, सागर शेळके, तुषार पंदारे, जनार्दन शेळके, संजू जाधव, राजू मोमीन, नाथसाहेब जगताप, नितीन सुदीक, भाग्यश्री जाधव, सागर धुमाळ आणि सचिन भोई यांचा सहभाग होता.

जे नागरिकांचे कौतुक, पोलिसांची सतर्कता

ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या दक्षतेचे आणि पोलिसांच्या सतर्क गस्तीचे उत्कृष्ट उदाहरण ठरली आहे. अवैध धंद्यांविरुद्ध अशा कठोर कारवायांमुळे नागरिकांच्या सुरक्षेला बळ मिळत असून, अशा मोहिमा सातत्याने राबवण्याची मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# खडकवासल्यातून २५ हजार क्यूसेकने विसर्ग, भिडे पूल पाण्याखाली

पुणे । प्रतिनिधी

गेल्या दोन ते तीन दिवसांपासून पुणे जिल्हा आणि शहर परिसरात मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. दरम्यान खडकवासला धरण साखळी क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरु असल्याने धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर सुरु करण्यात आला आहे. मुसळधार पावसामुळे खडकवासला धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. खडकवासला धरणातून सध्या २५ हजार ६९६ क्यूसेक वेगाने पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.

पुणे शहरात गेले दोन ते दिवस मुसळधार पाऊस कोसळत आहे. टेमघर, वरसगाव, पानशेत आणि खडकवासला धरण क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरु असल्याने पाणीसाठ्यात वेगाने वाढ होत आहे. त्यामुळे खडकवासला धरणातून कालपासून पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे. मुठा नदी पात्रात हा विसर्ग सुरु आहे. पुण्यातील प्रसिद्ध भिडे पूल पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे नदीपात्रातील रस्ता देखील बंद झाला आहे. धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु केल्याने नदीपात्रातील रस्ते वाहतुकीला बंद झाले आहेत. त्यामुळे पुणे शहरात वाहतुकीवर काहीसा परिणाम झाल्याचे पाहायला मिळाले आहे